

मुंबई : भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी गणपतीचे दर्शन घेऊन आरती केली. या वेळी केंद्रीय मंत्री पियुष गोयल व अन्य मान्यवर उपस्थित होते.


रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ५९
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १५ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


साथरोग आणि किटकजन्य आजारांपासून खबरदारी घ्या/३
माणगावजवळ दोन दुचाकींची धडक; चार जण जखमी/५
नवी मुंबईत शालेय बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात/८


# कांद्यावरील निर्यात मूल्य हटवले

## मोदी सरकारचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा; इतर उत्पादनांसंदर्भातही निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात मूल्य हटवले आहे. याबाबतची अधिसूचना काढण्यात आली आहे. कांद्यावर ५५० डॉलर प्रति मेट्रिक टन निर्यात मूल्य लागू होते. केंद्र सरकारच्या या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सरकारने कांद्यावरील निर्यात मूल्य रद्द केल्यानंतर निर्यात शुल्कातही कपात करण्यात आली आहे. कांद्यावर आता ४० टक्के निर्यात शुल्काऐवजी २० टक्के शुल्क आकारणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे यातून कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळेल.

याशिवाय खाद्यतेलाच्या आयातीवर आधी कोणतेच शुल्क नव्हते. त्यावर आता



२० टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना अधिक किंमत मिळेल. त्याचप्रमाणे रिफाइंड सोयाबीन, सूर्यफूल आणि पामतेलावर कस्टम शुल्क १२.५०%वरून ३२.५०% करण्यात आले आहे. सोयाबीन खरेदीचा निर्णय सरकारने आधीच घेतलेला आहे, तर बासमती तांदळाच्या निर्यातीसाठी किमान निर्यात किंमत (एमईपी) ही पूर्णपणे मागे घेण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मानले आभार

शेतकऱ्यांसंबंधी घेतलेल्या निर्णयांबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोदी सरकारचे आभार मानले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने आमच्या बळीराजासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मी त्यांचा अतिशय मनापासून आभारी आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला जास्त भाव मिळण्याच्या दृष्टीने हे निर्णय निश्चितपणे क्रांतिकारी ठरतील आणि त्यामुळे आमच्या कांदा, सोयाबीन, धान आणि तेलबिया उत्पादकांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी म्हटलेय.

# पनवेलच्या नवीन दिवाणी न्यायाधीश इमारतीवर आणखी दोन मजले होणार

## १७ कोटी ३१ लाख खर्चाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता | आमदार प्रशांत ठाकूर आणि वकील संघटनेच्या पाठपुराव्याला यश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील नवीन दिवाणी न्यायाधीश न्यायालयीन इमारतीवर दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी १७ कोटी ३१ लाख रुपये खर्चाच्या कामास शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल वकील संघटनेचा पाठपुरावा कामी आला.

पनवेलमधील नवीन कोर्ट इमारतीवर दोन मजले बांधण्याकरिता निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती तसेच या संदर्भात त्यांनी व पनवेल वकील संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या प्रयत्नांना यश आले असून याचा वकील, पक्षकार, नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

पनवेल येथील नवीन इमारतीमध्ये सह दिवाणी न्यायालय व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पनवेल हे सहा कोर्ट, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे चार कोर्ट, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय चार कोर्ट तसेच पोक्सो न्यायालय एक अशी एकूण १५ न्यायालये आहेत, परंतु नवीन कोर्टामध्ये तळमजला अधिक एक मजला असे एकूण प्रत्यक्षात आठ कोर्ट हॉल असून त्यामध्ये सद्यस्थितीत दाटीवाटीने १५ कोर्ट कार्यान्वित असून सात न्यायालयांना रितसर कोर्ट हॉल उपलब्ध नाही. याकरिता नवीन इमारतीमध्ये असलेली वकिलांची लायब्ररी तसेच कॅंटींगमध्ये सिव्हिल प्रीझोनमध्ये कोर्ट बसवण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली असून पनवेल न्यायालयाकरिता मंजूर न्यायाधीश, वकील व न्यायालयात येणारे पक्षकार यांच्या तुलनेने सध्याची इमारत अपुरी पडत आहे.

न्यायालयीन कामकाजासाठी येणाऱ्या सर्वांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देत न्यायालय इमारतीवर दोन मजले बांधकामासाठी जास्तीत जास्त आर्थिक निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती. त्यानुसार राज्य शासनाने या कामासाठी १७ कोटी ३१ लाख रुपये खर्चाच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली असून तसा शासन निर्णयही जाहीर केला आहे.

**या कामी पाठपुरावा केल्याबद्दल पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ आणि त्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांचे मनःपूर्वक आभार!**
**-प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल**

# सर्व शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा

## राज्य सरकारचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील खासगी तसेच सरकारी शाळेतील अभ्यासक्रमात मराठी विषय सक्तीचा करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मराठी विषयासाठी श्रेणी नाही, तर थेट गुणांकन करा असे निर्देश राज्य सरकारने दिले असून मराठी भाषा सक्तीकडे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२०पासून टप्प्याटप्प्याने



सुरू करण्यात आली आहे. तथापि, कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीच्या कालावधीत शाळा नियमित सुरू नव्हत्या. आता २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घ्यावीच लागणार आहे. या परीक्षेत मराठी विषयाला श्रेणी देऊन मूल्यांकन न करता गुण देऊन मूल्यांकन केले जाणार आहे.

इतर माध्यमातील शाळांमध्ये मराठी भाषा विषय गांभीर्याने शिकवला जात नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य सरकारकडून ही नवी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षापासून मराठीची परीक्षा सरकारी आणि खासगी शाळांना घ्यावीच लागणार आहे. मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

# उपराष्ट्रपतींच्या हस्ते आज संविधान मंदिराचे उद्घाटन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई अंतर्गत रायगड जिल्ह्यातील सर्व १६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचे उद्घाटन रविवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीव्दारे होणार आहे.

या समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांचे आमदार उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनीही या वेळी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या सचिवांनी केले आहे.

## निवडक

### कोलकातामध्ये स्फोट; एक जण जखमी

**कोलकाता** : पश्चिम बंगालची राजधानी कोलकातामध्ये शनिवारी (दि. १४) दुपारी १.४५च्या सुमारास स्फोट होऊन एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. बपी दास (वय ५८) असे या व्यक्तीचे नाव असून त्याने रस्त्यावर पडलेली थैली उचलल्यानंतर हा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमीला एनआरएस वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### ईद-ए-मिलादच्या सार्वजनिक सुट्टीमध्ये शासनाकडून बदल

**मुंबई** : अनंत चतुर्दशी आणि ईद-ए-मिलाद सण एकामागोमाग एक असल्याने दोन्ही समाजांमध्ये शांतता व सौहार्द रहावे यासाठी ईदची सार्वजनिक सुट्टी १६ सप्टेंबरऐवजी १८ सप्टेंबर रोजी देण्यात आली आहे. हा बदल मुंबईपुरताच मर्यादित असला तरी उर्वरित महाराष्ट्रातील जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन सुट्टी बदलाचा निर्णय घ्यावा, असे शासनाने कळविले आहे.

# संविधान शब्द तुमच्या तोंडात शोभत नाही

## पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर घणाघात

**डेडा : वृत्तसंस्था**

'मोहब्बत की दुकान' चालवण्याचा ते दावा करतात, मात्र काँग्रेसने आपल्या देशातील एका पत्रकाराला क्रूरपणाची वागणूक दिली. भारताच्या एका पुत्राचा अमेरिकेत अपमान केला. जे लोग अभिव्यक्ती स्वतंत्र्याचे चॅम्पियन असल्याचा दावा करतात त्यांनी ही क्रूरता केली. तुमच्या तोंडून संविधान शब्द शोभत नाही, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. १४) काँग्रेसवर निशाणा साधला.

पंतप्रधान मोदी जम्मू-काश्मीरमधील डेडा येथे आपल्या पहिल्या निवडणूक प्रचार सभेत बोलत होते. लोकशाही व्यवस्थेत स्वतंत्र मीडिया हा एक अत्यंत महत्त्वाचा पीलर असतो. आज एक वृत्त वाचले, अमेरिकेत गेलेल्या एका भारतीय माध्यम प्रतिनिधीसोबत तेथे क्रूरपणे वागले गेले. त्यांनी आपली संपूर्ण कहाणी जनतेसमोर मांडली आहे. अमेरिकेच्या भूमीवर भारताच्या पुत्राला, एका पत्रकाराला आणि तेही भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी काम करणाऱ्याला रुममध्ये कोंडून देण्यात आलेली वागणूक ही लोकशाहीत संविधानाची प्रतिष्ठा वाढवणारा विषय आहे की? अमेरिकेच्या भूमीवर भारताच्या पत्रकाराला मारहाण करून भारताची प्रतिष्ठा वाढवत आहात का? तुमच्या तोंडून संविधान शब्द शोभत नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

या वेळी पंतप्रधान मोदी यांनी उपस्थितांना काँग्रेसच्या खोट्या आश्वासनांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, काँग्रेसने हिमाचल प्रदेशची सत्ता मिळवण्यासाठी लोकांना अशी-अशी आश्वासने दिली की, आता संपूर्ण राज्य बरबाद झाले आहे.

## रिटघर येथील एक गाव एक गणपती!



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रिटघर येथील एक गाव एक गणपती परंपरा असलेल्या बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी ग्रामस्थांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानची विसर्जन ठिकाणी निर्माल्य संकलन सुविधा

## रेवदंड्यात खत निर्मितीचा संकल्प

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या स्तुत्य उपक्रमातून निर्माल्य संकलन सुविधा भाविकांसाठी विसर्जन ठिकाणी उपलब्ध करण्यात आली आहे. या निर्माल्य संकलनातून खत निर्मितीचा संकल्प करण्यात आला आहे.

डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने विसर्जन ठिकाणी निर्माल्य कलश उपलब्ध करण्यात आले आहेत. आपले निर्माल्य हे या निर्माल्य कलशामध्ये टाकण्याचे आवाहन डिजिटल बॅनरच्या माध्यमातून भाविकांना केले गेले आहे.



गणेशोत्सवातील दीड व पाच दिवसांच्या विर्सजनावेळी भाविकांनी चांगला प्रतिसाद डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानला दिला. प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत असलेल्या आवाहनानुसार भाविक निर्माल्य हे निर्माल्य कलशामध्ये जमा करत असल्याचे दिसते.

अनंत चतुर्थीच्या विसर्जनानंतर जास्तीत जास्त टन निर्माल्य संकलन करण्याचा प्रयत्न डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात येत आहे. या निर्माल्य संकलनातून खत निर्मिती करण्यात येणार आहे.

डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने निरूपणाबरोबरच स्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, समाजप्रबोधन यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. आता निर्माल्य संकलनातून खतनिर्मिती केली जाणार आहे.

## भीषण अपघातात चौघांचा दुर्दैवी मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

ड्रंक ॲण्ड ड्राईव्हच्या घटनेने छत्रपती संभाजीनगर हादरले आहे. दहा वर्षानंतर झालेल्या बाळाचे बारसे आटोपून पुण्याला जाणाऱ्या कुटुंबाच्या कारला दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या तरुणांच्या स्कॉर्पिओने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चौघांचा दुदैवी मृत्यू झाला आहे.

या अपघातात मृणालिनी अजय बेसरकर (३८), आशालता हरिहर पोपळघट (६५), अमोघ बेसरकर (सहा महिने), दुर्गा सागर गीते (७) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे; तर अजय अंबादास बेसरकर (४०), शुभांगिनी सागर गीते (३५) या जखमी झाल्या आहेत. लायसन नसताना कृष्णा केरे हा दारू पिऊन गाडी चालवत असल्याचे निदर्शनास आले. तो व मूळ चालक विशाल चव्हाणवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताची पाकिस्तानवर मात

**हुलुनबुईर (चीन) : वृत्तसंस्था**

भारताने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत पाकिस्तानचा २-१च्या फरकाने पराभव केला. भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंहने पेनल्टी कॉर्नरमध्ये दणदणीत दोन गोल करत संघाला विजय मिळवून दिला. भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ यापूर्वीच उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

भारतीय हॉकी संघाने पाकिस्तानचा पराभव करत स्पर्धेत सलग पाचव्या विजयाची नोंद केली आहे. भारताचे दोन्ही गोल कर्णधार हरमनप्रीत सिंगने केले, तर पाकिस्तानकडून एकमेव गोल अहमद नदीमने केला. या विजयासह भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे. दुसरीकडे पाकिस्तान



संघाचा हा पहिलाच पराभव आहे. गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानावर, तर पाकिस्तान संघ दुसऱ्या स्थानावर आहे.

भारत पाकिस्तान सामन्यातील पहिला गोल पाकिस्तानने आठव्या मिनिटाला केला. नदीम अहमदने गोल करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र यानंतर भारताने एकही संधी दिली नाही. कर्णधार हरमनप्रीत सिंगने काही वेळातच पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले. पहिल्या क्वार्टरनंतर स्कोअर १-१ असा बरोबरीत असला तरी दुसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि हरमनप्रीतने गोल केला. शेवटपर्यंत हा स्कोअर कायम ठेवत भारताने सामना जिंकला.

# काँग्रेसकडून विघ्नहर्त्याच्या पूजेतही विघ्न -पीएम मोदी

**हरियाणा : वृत्तसंस्था**

संपूर्ण देश आज गणेशोत्सव साजरा करत आहे आणि काँग्रेस विघ्नहर्त्याच्या पूजेतही विघ्न टकत आहे. तुष्टीकरणासाठी काँग्रेस काहीही करू शकते, अशा शब्दात शनिवारी (दि.१४) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्ला चढवला. ते हरियाणातील कुरुक्षेत्रात प्रचारसभेला संबोधित करत होते.



मोदी पुढे म्हणाले, काँग्रेससाठी तुष्टीकरण हेच सर्वांत मोठे लक्ष्य आहे. आज तर अशी परिस्तिती निर्माण झाली आहे की, काँग्रेसच्या राज्यात कर्नाटकमध्ये गणतपतीजींनाच तुरुंगात टाकले जात आहे. गणपतीजींना पोलिसांच्या पिंजऱ्यात बंद करण्यात आले. गांधीजी नेहमीच सत्याची बाजू घेत होते. स्वातंत्र्यानंतर काही वर्षे काँग्रेसवर महात्मा गांधींच्या संस्काराचा परिणाम होता, मात्र आज ही ती जुणी काँग्रेस नाही. आजची काँग्रेस म्हणजे, अर्बन नक्षलवादाचे नवे रूप बनली आहे. आता काँग्रेसला खोटे बोलण्यात कसल्याही प्रकारची लाज वाटत नाही. काँग्रेसचे खोटे पकडले गेले तरी तिला लाज वाटत नाही. काँग्रेस रोजच्या रोज एक नवं खोटं बोलते. काँग्रेस देशाच्या एकात्मतेवर सातत्याने वार करत आहे. काँग्रेसकडून देशावर नक्षलवादी विचार थोपले जात आहेत. एवढेच नाही तर, भाजपला बदनाम करण्यासाठी, भारताची बदनामी करण्यात त्यांना (काँग्रेस) जराही लाज वाटत नाही. यामुळे आपल्याला काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांपासून सावधान रहायचे आहे, असेही पंतप्रधान मोदी या वेळी म्हणाले.

मोदी पुढे म्हणाले, आमच्या हरियाणाचे लोक शब्दाचे अत्यंत पक्के आहेत. एकदा वचन दिले... की दिले. भाजपनेही हरियाणाकडून हेच शिकले आहे. मी तर हरियाणाची 'रोटी' खालली आहे. भाजप जे बोलते ते नक्की करून दाखवते. एवढेच नाही तर, देशातील वृद्धांना दिलेल्या गॅरंटी मोदीने पूर्ण केली आहे. मी हरियाणातील सर्व भाऊ बहिणींना सांगेन की, आपण आपल्या मुलांकडे लक्ष द्या, आपल्या माता-पित्यांची चिंता आपला हा मुलगा, आपला हा भाऊ करत आहे. हरियाणामध्ये भाजप सरकार संपूर्ण सेवाभावाने काम करत आहे, असेही मोदी म्हणाले.

## हरियाणात भाजपची हॅट्ट्रिक निश्चित!

**या वेळी सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी आपल्या सरकारच्या कामांचा पाढा वाचत हरियाणामध्ये पुन्हा एकदा भाजप सरकार स्थापन होईल असा विश्वास व्यक्त केला. हरियाणामध्ये भाजपची हैटट्रिक निश्चित असल्याचेही ते म्हणाले तसेच विकसित भारतासाठी हरियाणा विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. हरियाणाच्या पावण भूमिवरून मी आपल्या सर्वांना पुन्हा एकदा भाजप सरकार बनवण्यासाठी निवेदन करतो, असेही मोदी म्हणाले.**

# रोहा रेल्वे स्टेशनचे होणार सुविधांयुक्त सुशोभीकरण

## खासदार सुनील तटकरे यांचा पुढाकार

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे स्टेशनचे सुविधायुक्त सुशोभीकरण होणार असून यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे रोहे अष्टमीकर व रेल्वे प्रवाशांना खासदार सुनील तटकरे यांनी गणेश उत्सवाची भेट दिली आहे.




अद्यावत सुसज्ज व सुविधा युक्त रेल्वे स्टेशन कशा पद्धतीने असणार आहे याची पाहणी खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांच्यासह संबंधित अधिकारी यांनी रोहा रेल्वे स्टेशनची नुकतीच पाहणी केली आहे. या वेळी राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, नितीन पिंपळे, निलेश शिर्के, राहुल बोबड, हरेश पिंपळे आदी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे यांच्याकडून रोहा-अष्टमी रेल्वे प्रवाशांना गणेशोत्सवानिमित्त अनोखी भेट मिळाली असून रोहा रेल्वे स्टेशन सुसज्ज, सुविधायुक्त व रेल्वे स्टेशन परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. यासाठी खासदार तटकरे यांनी अथक प्रयत्न केले असून त्याचा उपयोग सर्व रोहा तालुक्यातील नागरिकांना होणार आहे.

सद्य परिस्थितीत रोह्यातील रेल्वेस्टेशनकडे जाणारा रस्ता, पार्किंगच्या सुविधा, तिकीट खिडकी, वाहतूक कोंडी व प्लॅटफॉर्मवर असलेल्या शौचालय, पिण्याच्या पाणी, वेटिंग रूम अशा अनेक समस्यांचा सामना प्रवाशांना रोजच करावा लागत आहे. या समस्येचा विचार करून खासदार तटकरे यांनी रेल्वे प्रवाशांना सुसज्ञ अशा सुविधा मिळावा यासाठी पाठपुरावा केला आहे. यातूनच रोहा रेल्वे स्थानकाचा सुशोभीकरण होणार आहे. रोहा रेल्वे स्थानक व परिसरात होणार असलेल्या सुशोभीकरणांमध्ये मुख्य रस्त्यापासून स्टेशनपर्यंत दोन पदरी रस्ता दुभाजकासहित होणार असल्यामुळे ट्रॅफिकच्या समस्येच निराकरण होणार आहे. त्या रस्त्यावर पथदिवे व्यवस्था असणार आहे. रात्री उशिरा रेल्वेसाठी जाणाऱ्या प्रवाशांना त्याचा फायदा होणार आहे. रिक्षा व्यावसायिक रेल्वेस्टेशनला भाड घेऊन जातात. त्यांची गैरसोय होते आता होणाऱ्या सुविधांमध्ये रिक्षा चालकांसाठी सुसज्य अशा वेगळ्या स्टॅन्डची व्यवस्था, सुलभ शौचालय तसेच त्यांना बसण्याकरिता सुसज्ञ शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अशा सुविधा होणार आहेत.

खासगी मोठ्या गाड्या व मोटार सायकल अशा दोन्ही गाड्यांसाठी वेग वेगळे वाहन तळ होणार आहे. त्यामुळे एका दिवसात ज्यांना रेल्वेस्टेशनला गाडी पार्क करून परतीचा प्रवास करायचा असेल त्यांच्यासाठी याचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे. संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार असून अनेक फुलंझाडे लावून निसर्गाचा आंनद सुद्धा आपल्याला अनुभवता येणार आहे. त्याचप्रमाणे सगळ्या प्लॅटफॉर्मचे सुशोभीकरण करण्यात येणार असून सुसज्य असे टॉयलेटची व पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. महिलांना बेबी केअर रूम व फिडींग रूम ह्या रूम इतर कोणत्याही स्टेशवर नसतील अशा पद्धतीने होणार आहेत.

अनेक वृद्ध किंवा नागरिकांना जिन्यावर सामान घेऊन चढायला खूप त्रास होतो याचा विचार करून दुसऱ्या प्लॅटफॉर्म वर जाताना क्रॉसिंग ब्रिजवर चढायला सरकता जिना किंवा लिफ्ट अशा अत्याधुनिक सुविधा निर्माण होणार आहेत. त्याचप्रमाणे महिला व वृद्धांसाठी वातानुकुलीत वेटिंग रूम होणार आहेत.

अशा एक ना अनेक सुविधा रोहेकर नागरिकांना अनुभवायला मिळून त्या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे भविष्यात रोह्याचे नाव अधिक उज्वल होऊन या सर्व सुविधांचा फायदा सर्व सामान्य प्रवाशासहित व्यापारी वर्गाला व नोकरीनिमित्त प्रवास करणाऱ्या वर्गाला मोठ्या प्रमाणात होणार आहे. याचा फायदा शहराचा विस्तारसुद्धा वाढणार आहे.

**खासदार सुनील तटकरे यांच्यामुळे रोहा रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण होणार आहे या रेल्वे स्थानकात प्रवाशांना सुसज्ञ अशा सुविधा मिळणार आहेत याचा लाभ रोहा व परिसरातील रेल्वे प्रवाशांना होणार आहे**

**-संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष**

# नवी मुंबईत सातव्या दिवशी ३०८६ बाप्पांना भावपूर्ण निरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेने २२ नैसर्गिक व १३७ कृत्रिम विसर्जनस्थळी केलेल्या सुसज्ञ विसर्जन व्यवस्थेमध्ये सातव्या दिवशी ३०८६ श्रीगणेशमूर्तींना भाविकांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' अशा गजरात भावपूर्ण निरोप दिला.



विशेष म्हणजे यात ३३३ शाडूच्या मूर्तींचा समावेश होता. पीओपी ऐवजी शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टीकोन जपणाऱ्या गणेशभक्तांना विशेष प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे १३७ इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावात श्रीमूर्तींचे विसर्जन करणाऱ्या ५९१ पर्यावरण जागरूक नागरिकांनाही कापडी पिशव्यांचे वितरण करून गौरविण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या आवाहनास पर्यावरण जागरूक नवी मुंबईकर नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

नैसर्गिक विसर्जन स्थळांवर तराफ्यांची व्यवस्था होती तसेच आवश्यक विद्युत व्यवस्था आणि जनरेटर व्यवस्था करण्यात आली होती. नैसर्गिक विसर्जन स्थळापासून नजिकच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्याठिकाणी वैद्यकीय पथके तैनात होती व विसर्जन व्यवस्थित रितीने व्हावे याकरिता आवश्यक संख्येने स्वयंसेवक व लाईफगार्ड्स विभाग कार्यालयांमार्फत कार्यरत होते. यासोबत नमुंमपा अग्निशमन दलाचे जवानही सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष होते.

नमुंमपा क्षेत्रातील २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांवर २३४१ घरगुती तसेच १५४ सार्वजनिक मंडळांच्या २४९५ श्रीमूर्तींचे विसर्जन झाले. तसेच १३७ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ५८८ घरगुती तसेच तीन सार्वजनिक मंडळांच्या ५९१ श्रीमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे २४९५ घरगुती व ५९१ सार्वजनिक मंडळांच्या एकूण ३०८६ श्रीगणेशमूर्तीचे विसर्जन सातव्या दिवशी सुरळीतपणे झाले. यामध्ये शाडूच्या ३३३ श्रीगणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १५९ विसर्जन स्थळांवर ३०८६ श्रीगणेशमूर्तींना भक्तीपूर्ण निरोप देण्यात आला.

यापुढील विसर्जन सोहळा मंगळवारी (दि.१७) होणार असून यादिवशी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन होत असल्याने नवी मुंबई महापालिकेची सर्व विसर्जन स्थळांवर असणारी यंत्रणा आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली अधिक सक्षमतेने कार्यरत असणार आहे. त्याचप्रमाणे पोलीस विभागाच्या वतीने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. वाहतुक पोलीस विभागाच्या वतीनेही वाहतुकीविषयी सूचना प्रसारित करण्यात येतील.

## अत्याचार करून मुलीची हत्या

**नंदूरबार : प्रतिनिधी**

बदलापूरनंतर नंदूरबारमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

नंदूरबारच्या तळोदा तालुक्यातील खरवडमध्ये ही संतापजनक घटना घडली आहे. नंदूरबारमधील या घटनेने राज्यात सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर नंदूरबार पोलिसांनी २४ तासांत आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदूरबारच्या तळोदा तालुक्यातील खरवड येथे खळबळजनक घटना घडली आहे. जिल्हा परिषदेची शाळा शिकणाऱ्या सहा वर्षीय मुलीचं अपहरण करून हत्या झाल्याची संतापजनक घटना घडली आहे. अत्याचार आणि हत्येच्या घटनेनंतर पोलीस विभागाने तातडीने या गुन्ह्याची दखल घेत आरोपीला २४ तासांच्या बेड्या ठोकल्या आहेत.

# घरगुती गणपती सजावटीतून मानवी उत्क्रांतीचा प्रवास

## अलिबागच्या धुमाळ कुटुंबीयांनी देखाव्यातून दाखवले टप्पे



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथील रमेश धुमाळ यांनी आपल्या घरच्या गणेशोत्सवातील सजावटीमध्ये या वर्षी माणसाची गोष्ट सांगितली आहे.

मानवी उत्क्रांतीचे टप्पे या विषयावरील देखावा चलतचित्राच्या माध्यमातून साकारला आहे. हा देखावा पाहण्यासाठी अलिबागच्या ग्रामीण भागातून गर्दी होत आहे. पेशाने शिक्षक असलेले नांगरवाडीचे रमेश धुमाळ यांना लहानपणापासूनच कलेची आवड. शिक्षक झाल्यानंतर शैक्षणिक साहित्य निर्मितीत वेगवेगळे प्रयोग करत असतात. त्यांच्या या प्रयोगशीलतेचे राज्य पातळीवरदेखील कौतुक झाले आहे. धुमाळ गुरूजी दरवर्षी आपल्या घरच्या गणेशोत्सवात वेगवेगळ्या विषयांवर आधारीत सजावट करत असतात आणि त्यातून सामाजिक संदेश देण्याचा किंवा प्रबोधन करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

यंदाच्या उत्सवात त्यांनी मानवी उत्क्रांतीचे टप्पे मांडण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. अश्मयुगापासून आज संगणक युगापर्यंत मानवाने प्रगती केलीय. मानवी उत्क्रांती आपण अभ्यासक्रमात शिकतो, मात्र सामान्य माणसाला हे टप्पे माहीत नसतात. हे माहीत व्हावे या हेतूने ह देखावा यंदा सादर केल्याचे रमेश धुमाळ यांनी सांगितले.

हा देखावा पूर्णपणे पर्यावरणपुरक असून देखावा तयार करताना रोजच्या वापरातील वस्तूंचा विनियोग करण्यात आलाय. देखावा पाहण्यासाठी ग्रामीण भागातील नागरीकांची गर्दी होत असून असे चलतचित्र आमच्या शाळांमध्येही तयार करून द्या अशी मागणी शाळांकडून होत असल्याचे धुमाळ यांनी सांगितले.

धुमाळ गुरूजी आपल्या देखाव्यात चलचित्रांचा वापर करत असतात. त्यात बऱ्याचशा टाकावू किंवा घरगुती वस्तू असतात; त्यांचा खुबीने वापर केलेला असतो. हा देखावा चलचित्रांमुळे गुरूजींचा दरवर्षीचा नवीन देखावा मागील काही वर्षात आकर्षणाचा विषय ठरतो आहे.

## माणगावमध्ये संत गोरोबांचा देखावा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील साईनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा संत गोरा कुंभार चलचित्र देखावा पाहण्यासाठी अलोट गर्दी होत आहे.

साईनगरचा राजा हा माणगाव तालुक्याचा एक आकर्षण असून नवसाला पावणारा राजा म्हणून या मंडळाच्या गणरायाची ओळख असून मंडळाचा हा दहा दिवसांचा गणराय आहे. दरवर्षी ऐतिहासिक व पौराणिक तसेच सामाजिक विषयावर आधारित चलचित्र देखावे असतात.

मंडळाचा हा गणेशोत्सव भक्तिभावाने व विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष गणेश दूरकर, उपाध्यक्ष परेश म्हात्रे, सचिव प्रणव जंगम,सहसचिव केतन घोसाळकर, खजिनदार स्वप्नील झेंडे, सहखजिनदार केदार जाधव व त्यांचे सर्व सहकारी सदस्य तसेच जेष्ठ नागरिक, महिला मंडळ, युवक कार्यकर्ते व ग्रामस्थ उत्साहाने सहभागी होत असतात.

## सापडलेले पाकिट दुकानदाराने केले परत

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील लकी पान सेंटर येथे एका पर्यटकाचे पैशाचे पाकीट गहाळ झाले होते. पाकीट येथील दुकानदाराला सापडले. हे पाकीट त्याने पर्यटकाला परत करीत आपल्या प्रामाणिकपणाचे दर्शन घडविले आहे.

अलीकडच्या काळात समाजातील प्रामाणिकपणा, खरेपणा हरवत चालला असल्याचे चित्र अनेकवेळा दिसत आहे तसेच दिवसेंदिवस दुर्मीळ होत असलेला माणसातला जाणतेपणा, माणुसकीदेखील कमी होत चालली आहे.




असे असताना माथेरान मधील एका छोट्याश्या पान दुकानदाराने पर्यटकाचे मिळालेले पैशाचे पाकीट त्याला इमानदारीने परत करीत आपला प्रामाणिकपणा सिद्ध केला असून सोशलमीडियाद्वारे माथेरानमधून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. माथेरान पर्यटनस्थळी येणारे पर्यटक अनेकदा आपल्या वस्तू इतरत्र विसरत असतात मात्र येथील स्थानिक माथेरानकर प्रत्येकवेळी प्रामाणिकपणे त्या वस्तू त्यांना परत करीत असतात. त्यामुळेच पर्यटकांचा माथेरानवासीयांवर पूर्ण विश्वास असून या पर्यटनस्थळी त्यांची मोठी गर्दी पाहवयास मिळते.

## सार्वजनिक गणेशोत्सवातून चलचित्रांचे प्रमाण होतेय कमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सवातून देखावे आणि चलचित्र यांचे प्रमाण कमी होत चालल्याचे दिसून येत आहे. वाढत्या महागाईमुळे देखाव्यांवर होणारा खर्च टाळणाचा निर्णय अनेक गणेशोत्सव मंडळांनी घेतला आहे. यंदा अलिबागमधील बहुतांश गणेशोत्सव मंडळांनी देखावे आणि चलचित्र साकारलेले नाहीत.

गणेशोत्सवातील देखावे हे समाज प्रबोधनाचे माध्यम म्हणून ओळखले जात. या देखाव्यातून निरनिराळ्या विषयांवर संदेश दिले जात असत. त्यासाठी चलचित्रांचादेखील वापर केला जात असे, परंतु वाढत्या महागाईमुळे सर्वजनिक गणेशोत्सव मंडळांना देखाव्यांवर होणारा खर्च परवडेनासा झाला आहे.



यामुळे देखाव्यांवर होणारा खर्च कमी करण्याचा निर्णय सार्वजनिक गणेशात्सव मंडळांना घ्यावा लागत आहे. यामुळे देखावे आणि चलचीत्र गणेशोत्सवातून हद्दपार झाले आहेत. अलिबागमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट दिल्यास याचाच प्रत्यय येत आहे.

देशातील सामाजिक व राजकीय घटनांवर आधारीत देखावे केल जात असत. नुकत्याच पार पडलेल्या ऑलंपिक स्पर्धा या सारख्या घटनांवर आधारीत देखावे यंदाच्या गणेशात्सवात पहायाला मिळतील अशी अपेक्षा हाती, परंतु तसे कुठेही दिसत नाही. पौराणिक कथांवरील देखाव्यांचे प्रमाणही हळूहळू कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

यंदा अलिबागमधील सर्वच गणेशमंडळांनी देखावे आणि चलचित्र यावर होणारा खर्च टाळल्याचे दिसून येत आहे. निर्बंधामुळे कमीत कमी खर्चात गणेशाचे आरास करण्यावर सर्वांनी भर दिल्याचे दिसून येत आहे. त्याऐवजी एलईडी स्क्रीन लाऊन त्यावर निरनिराळ्या स्पेशल इफेक्ट्सचा वापर सजावट करण्यावर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी भर दिला आहे.

## 'बोलता बोलता' पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई :** व्यास पब्लिकेशन हाऊस प्रकाशित 'बोलता बोलता' या निवेदक महेंद्र कोंडे लिखित पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, गीतकार प्रा. प्रवीण दवणे यांच्या हस्ते ठाणे येथे झाले.

या वेळी प्रज्ञा दवणे, लेखक - निवेदक महेंद्र कोंडे, व्यास क्रिएशन्सचे संचालक निलेश गायकवाड, व्यास पब्लिकेशन हाऊसच्या प्रकाशिका वैशाली गायकवाड, साहित्यिक विनोद पितळे, निवेदिका वेदश्री दवणे उपस्थित होते.

वाद्यवृंदांचे बैठकी निवेदन, सूत्रसंचालन, आकाशवाणी, दूरदर्शन, ऑनलाईन कार्यक्रम यांचे निवेदन अशा नानाविध क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या पुस्तकामधील सगळी प्रकरणे सूत्रसंचालनच नाही तर व्यासपीठावर कोणत्याही प्रकारची शब्द मुशाफिरी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयोगी असल्याचे प्रवीण दवणे म्हणाले. निलेश गायकवाड, वैशाली गायकवाड व विनोद पितळे यांनी शुभेच्छा दिल्या. निवेदिका वेदश्री दवणे यांनी या कौटुंबिक स्वरूपातील पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे ओघवते सूत्रसंचालन केले.



# साथरोग, किटकजन्य आजारांपासून सावधान!

## पनवेल मनपाकडून नागरिकांना खबरदारीचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे.



वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत घ्यावयाच्या खबरदारी विषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे. पावसाळ्यामध्ये अनेकवेळा दूषित पाण्यामुळे कॉलरा , गॅस्ट्रो, विषमज्वर असे जलजन्य रोग होण्याची भिती असते त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात.

सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहिरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा.

घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक वेळा पुर्णपणे काढून कोरडे करून कोरडा दिवस पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही अशा हॉटेल व इतर ठिकाणी, खाणे, पाणी पिणे टाळावे, बाहेरील बर्फ खाणे टाळावे. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

एमएमआर क्षेत्रातील ठाणे महापालिका क्षेत्राची डेंग्यू पॉझिटीविटी ही ४५.३४टक्के, कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्राची डेंग्यू पॉझिटीविटी ही ३५.१० टक्के, नवी मुंबई महापालिकेची डेंग्यू पॉझिटीविटी ५३ टक्के आहे. या सर्व महापालिकेच्या तुलनेत पनवेल महापालिकेची डेंग्यू पॉझिटीविटी ही ८.१२ टक्के आहे. म्हणजेच पनवेल महापालिकेची डेंग्यू पॉझिटीविटी ही दहा टक्क्यांपेक्षा कमी असल्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये.

> **महापालिका क्षेत्रात साथ उद्रेक परिस्थिती नसली तरी नागरिकांनी सतर्क रहावे. आपला परिसर व घर स्वच्छ ठेवा. कोरडा दिवस पाळा, परिसरात पाणी साठू देऊ नका. डासोत्पत्ती स्थाने नष्ट करा आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करा.**
>
> **-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

# मोकाट गुरांचे रस्त्यावर अतिक्रमण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीत मोकाट गुरे ही वाहन चालकाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. ही मोकाट गुरे सरळ रस्त्याच्या मधोमध बसण्याचा मार्ग अवलंबतात.



परिणामी वाहतुकीची कोंडीची समस्या डोके वर काढत आहे. त्याचबरोबर वाहन चालकास अपघाताला सामोरे जावे लागत आहे. ही वस्तुस्थिती सध्या निर्माण झाली आहे. यामध्ये मोकाट गुरे आणि शेतकऱ्यांची गुरे यांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. रात्रीच्या वेळी सावरोली-खारपाडा या रस्त्यावर अवजड वहाणांची रेलचेल असल्यामुळे ह्या गुरांना मृत्यू-मूखी ला सामोरे जावे लागते.

यामध्ये प्रामुख्याने गाय, बैल, वासरे, यांचा मोठया प्रमाणात समावेश असतो. त्याचबरोबर गुरे चोरीचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वाहन चालकाच्या समोर अचानक मोकाट गुरे आल्यास अपघात

### अपघातांत वाढ

होण्यास वेळ लागत नाही. मोकाट गुरे प्रामुख्याने रसायनीतील मोहोपाडा, रिस, आपटा या परिसरात ह्या मोकाट गुरांनी रस्त्यावर आपला मोर्चा रस्त्यावर वळविला आहे. आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडाच्या खाली बसण्याचा मार्ग अवलंबतात. परिणामी वाहतुकीची कोंडी, अपघात इ.समस्या भेडसावत आहे. या सर्व कारणावरून अपघाताचे प्रमाणत वाढत चालले आहे. यामुळे दिवसा-रात्री वाहन चालकास मोठ्या हुशारीने वाहन चालवावे लागते.

अशा परिस्थितीत एखादे जनावर समोर आल्यास अपघाताला सामोरे जावे लागते. वाहन चालकास रात्रीच्या वेळी वाहन चालवणे हि एक मोकाट गुरांच्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली आहे.

# मोहोपाडा येथे भटक्या कुत्र्यांची दहशत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीसह मोहोपाडा नवीन पोसरी विभागात भटक्या कुत्र्यांनी थैमान घातले असून भितीचे वातावरण नागरिकांमध्ये पसरले आहे.

मोहोपाड्यातील श्री दत्त मंदिर परिसरातील वस्ती, मोहोपाडा जिल्हा परिषद शाळा, विजय म्हस्कर यांच्या निवासस्थानासमोरील चौक, मोहोपाडा मुख्य बाजारपेठ तसेच नवीन पोसरीत ठिकठिकाणी भटके कुत्र्यांचा मोठ्या ग्रुपचा वावर दिसून येत आहे.

भटके कुत्रे हे लहान ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार ठिकठिकाणी रात्रीच्या वेळी हे कुत्रे मोठमोठ्याने भुंकत आहेत व येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकी स्वाराचा पाठलाग करीत आहेत. त्यामुळे दुचाकी स्वाराला जीव मुठीत धरून दुचाकी चालवावी लागत आहे. यामुळे दुचाकी चालवत असताना दुचाकीस्वाराचा पुढे धडक बसून अपघात होण्याची शक्यता असून नागरिक या भटक्या कुत्र्यांमुळे त्रस्त झाले असून एवढ्या कुत्र्यांचा ग्रुप मोहोपाडा परिसरात कसा काय आला? यांना कोण आणून सोडतो का? असे प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ नागरिक करत आहेत.

# बसमधून उतरलेला व्यक्ती हरवल्याची तक्रार

**पनवेल** : कळंबोली येथे बसमधून उतरलेला एक व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



बाळू देवसिंग शेळके (वय ४०) असे बेपत्ता व्यक्तीचे नाव असून उंची पाच फुट सहा इंच, रंग गोरा, केस काळे, नाक सरळ, डोळे काळे असून, कपाळावर उजव्या बाजूस टेंगुळ आहे. नाकाला मार लागल्याची खुण आहे. त्याच्या अंगात निळा शर्ट व काळी पॅन्ट, तसेच पायात काळे बुट आहेत. सोबत मोबाईल फोन आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा हवालदार एच.एस.शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आईच्या पुण्यतिथींनिमित्त अन्नदान व फळेवाटप



**पनवेल : वार्ताहर**

संजय शामराव गावडे यांची आई कै. सौ कमल श्यामराव गावडे यांच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्ताने गुरुवारी (दि.१२) नवीन पनवेल येथील कमळ अर्णव चॅरिटेबल फाउंडेशन या बालआश्रमात लहान मुलांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले.

नवी मुंबई वाहतूक शाखेत असणारे संजय गावडे यांनी आपल्या आईच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त नवीन पनवेल सेक्टर ६ नवीन पनवेल येथील कोमल अर्णव ट्रस्ट द्वारे चालविले जाणाऱ्या अनाथ मुलांचे आश्रमात अन्नदानाचा उपक्रम राबवला. या वेळी स्मृतीस अभिवादन केले. गावडे यांनी बाळ आश्रमात स्वतः अन्नदान करून करीत आपल्या हाताने जेवण खाऊ घातले. पुर्ण दिवस आश्रमातील लहान मुलांसोबत घालवला.

या उपक्रमाप्रसंगी आश्रमाचे संस्थापक यांची उपस्थिती होती. या राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**उरण : तालुक्यातील द्रोणागिरी येथील जय मल्हार सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार महेश बालदी भेट घेऊन त्यांचा विशेष सन्मान केला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सागर खांडेकर, उपाध्यक्ष राजूभाऊ करे, खजिनदार हरीबा चवरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

# उरण तालुक्यात बचत गटांच्या फराळाला मागणी





### महिलांना आर्थिक सहाय्य

***सुरुवातीला घरगुती स्वरूपात फराळ, मोदक, पुरणपोळी हे पदार्थ बनवत होते, मात्र नंतर वाढत्या ऑर्डर पाहता एकटीने शक्य नसल्याने बचत गटाच्या महिलांची मदत घेऊन हे पदार्थ बनविण्यास सुरुवात केली. या महिलांना ट्रेनिंग मिळाल्याने त्या खूप सुंदर पदार्थ बनवीत आहे व व प्रत्येक वर्षी मागणीत वाढत होत आहे. यामुळे महिलांनादेखील गणेशोत्सवात आर्थिक सहाय्य मिळत आहे.***

**उरण : प्रतिनिधी**

गेल्या कित्येक दिवसांपासून आतुरतेने वाट पाहणारा गणेशोत्सव सुरू आहे. घराघरात विराजमान झालेले दीड, अडीच व पाच दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन झाले आहे, मात्र या गणेशोत्सवात फराळ तसेच उकडीचे मोदक, पुरणपोळी किचकट काम असून गृहिणी वेळेअभावी फराळ, उकडीचे मोदक, पुरणपोळी विकत आणत आहेत.

दुकानातील फराळ, पुरणपोळी उकडीचे मोदक चवीला छान व घरगुती चवीचे लागत नसल्याने उरण शहर व तालुक्यातील बचत गटाच्या मोदक पुरण पोळी व फराळाला चांगलीच मागणी मिळत आहे. हल्ली शहरी भाग असो किंवा ग्रामीण भाग कित्येक महिला कामासाठी बाहेर पडत आहेत. उरण परिसरातदेखील ही स्थिती आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या सणाला पाहुण्यांची रेलचेल यामुळे कमी वेळात फराळ, उकडीचे मोदक, पुरणपोळी कसे बनवावे ही गृहिणींची चिंता आता बचत गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या या पदार्थांमुळे मिटली आहे. गणेशोत्सव काळात उरण परिसरात अनेक मिठाईच्या दुकानात मिठाई सोबत उकडीचे मोदक, पुरणपोळी देखील विक्रीसाठी ठेवले जातात. मात्र हा फराळ मोदक पुरणपोळी जरी विकत घेतले, तरी घरगुती चवीचा स्वाद या पदार्थांना नसतो.

त्यामुळे चवीला घरगुती तसेच अगदी बजेटमध्ये बसणारे उकडीचे मोदक पुरणपोळी महिला बचत गटात बनवून मिळत असल्यामुळे हे पदार्थ घेण्याकडे कित्येक महिलांचा कल आहे. मोदक पुरणपोळी सोबत करंजी, चकली, लाडू, शंकरपाळ्या, चिवडा अगदी अनारसेदेखील बचत गटाच्या माध्यमातून बनविण्यात येत आहेत यामुळे घरगुती महिलांना चांगलाच रोजगार मिळाला आहे. नोकरीवर जाणाऱ्या महिलांना उकडीचे मोदक, ओल्या नारळाची करंजी, पुरणपोळी हे पदार्थ बनवणे थोडेफार वेळखाऊ आणि किचकट असल्याने पुरणपोळी मोदक करंजीच्या ऑर्डर अधिक येत असल्याचे बचत गटाच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे.

याचप्रमाणे बऱ्याचदा अनेक महिलांचे मोदक व पुरणपोळी फसतात त्यामुळे या ऑर्डर अधिक येत आहेत. दर्जेदार आणि खमंग पदार्थ बचत गट दुकानापेक्षा स्वस्तात देत असल्याने हा पदार्थ घेण्याकडे महिलांचा कल अधिक आहे. त्याचप्रमाणे या बचत गटातील महिलांना दुकानदारदेखील पदार्थांची ऑर्डर देत आहे त्यांनी केलेले खुमासदार पदार्थ हातोहात संपत असल्याने गेल्यावर्षी तुलनेत अधिक ऑर्डर आले असल्याचे बचत गटाच्या माध्यमातून सांगण्यात आले आहे.

# उरण येथील ग्राहकांची फसवणूक करणारा आरोपी पोलिसांच्या कोठडीत

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणमध्ये आर्थिक फसवणूक प्रकरणातील फरार आरोपीला अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तो सद्या पोलीस कोठडीत आहे.

उरण शहरातील रहिवाशी तसेच विविध ठिकाणच्या ग्राहकांची यांची कर्जाच्या आर्थिक प्रकरणात अमर मोबाईल शॉपचे प्रोपायटर अमर केंद्रे यांनी फसवणूक केली असून पीडित व्यक्तींनी एकत्र येऊन उरण पोलीस ठाण्यात संबंधित फसवणूक करणाऱ्या अमर मोबाईल शॉपचे प्रोपायटर अमर केंद्रे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. शेकडो ग्राहकांची करोडो रुपयांची ही फसवणूक झाल्याचे या प्रकरणातून समोर आले आहे. अनेक महिने झाले अमर केंद्रे हा फरार होता, मात्र जागरूक नागरिक व पीडित फसवणूक झालेल्या नागरिकांनी या अन्याया विरोधात वेळोवेळी आवाज उठविला असून, अमर केंद्रे याला अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

नागरिकांची फसवणूक केल्याने अमर केंद्रे यांच्यावर ग्राहकांच्या नावे कर्ज काढून ते स्वतः फेडण्याची हमी घेतल्या प्रकरणी २० जून २०२४ रोजी उरण पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला होता.तेंव्हा पासून अमर केंद्रे फरार होता मात्र काल अमर केंद्रे याला उरण पोलिसांनी अटक केली असून उरण येथील कनिष्ठस्तर न्यायालयासमोर हजर केले असता, १८ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे प्रकटीकरण विभागाचे सहाय्यक निरीक्षक शिवाजी हुलगे यांनी दिली आहे.

# रोजगाराभिमुख मोफत प्रशिक्षण व नोकरी सहाय्य

**पनवेल : वार्ताहर**

रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे मोफत आयोजन केले आहे.

बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह, ऑटोमोटिव्ह कन्सल्टन्ट, फ्रंट ऑफिस असिस्टंट, कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह, क्वीक सर्व्हिस रेस्टॉरंट एक्झिक्युटिव्ह, फूड अँड बेव्हरेज सर्व्हिसेस स्टिव्हर्ड, हाऊस किपींग ऑपरेशन्स, रिटेल सेल्स असोसिएट्स, ऑटो सर्व्हिस टेक्निशियन, असिस्टंट इलेक्ट्रिशियन, फिल्ड टेक्निशियन एसी, जनरल ड्युटी असिस्टंट या कोर्सेसचे प्रशिक्षण आहे. प्रशिक्षणासाठी वयोमर्यादा १८ ते २९ अशी आहे तर शैक्षणिक पात्रता १०वी अथवा १२वी अथवा पदवीधर अशी आहे.

प्रशिक्षणामध्ये वर नमूद केलेल्या कोर्सेसचे इंडस्ट्री ओरिएंटेड ट्रेनिंग, पर्सन्यालिटी डेव्हलपमेंट, कॉम्प्युटर अँड इंग्लिश ट्रेनिंग, इंडस्ट्री व्हिजीट, प्लेसमेंट असिस्टंस यांचा समावेश आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क साधावा. यशवंत मेमोरियल ट्रस्ट, पनवेल ९८१९२४८७७१/९८१९५४०४४८ येथे साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**नवीन पनवेल : जागृती पीपल्स असोसिएशन व अष्टविनायक मित्र मंडळ यांच्या वतीने प्रतिष्ठापना करण्यात आलेले श्री गणराय.**



**नवीन पनवेल : येथील सुरेश पांडुरंग ढालपे यांच्या घरात गौरी गणपतीचे आगमन झाले होते. या वेळी महिलांनी मनोभावे पूजा-अर्चा केली.**

# अलेक्झांड्रा थिएटरची इमारत झाली १०३ वर्षांची

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढी मुव्हीज (आजची युवा पिढी चित्रपटाला मुव्हीज म्हणते) पाहण्यासाठी मल्टीप्लेक्स, मोबाईल स्क्रीन, लॅपटॉप, यू ट्यूब, ओटीटी प्लॅटफॉर्म यात रमली असल्यानेच त्यांना मुंबईत अलेक्झांड्रा नावाचे एक इंग्रजकालीन चित्रपटगृह होते याची कदाचित कल्पना नसेल. बरं इतकेच नव्हे तर ऑल्फ्रेड हिचकॉकचा ३९ स्टेप्स हा चित्रपट येथे 'एक कम चालीस लंबे' असे नामांतर करून प्रदर्शित झाला आणि असेच नावात बदल करून येथे इंग्रजी चित्रपट प्रदर्शित करण्याची प्रथा होती असं सांगितले तर भुवया उंचावतील. आजच्या टेक्नॉसॉव्ही पिढीला अधिक माहिती मिळवण्यासाठी गुगलवर जाण्याची गरज वाटते तसे ते एव्हाना गेलेदेखील असतील, पण संदर्भ, माहिती, तपशील मिळवल्याने चित्रपट, चित्रपटगृह आणि त्याचे विश्व समजते असे मुळीच नसते. त्यासाठी त्या क्षेत्रात पाऊल टाकून निरीक्षण, छोट्या मोठ्या भेटीगाठी, मुलाखती यातून पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे जग समजते. लाईव्ह अनुभव येतो.



अलेक्झांड्रा थिएटर हा एकदा अतिशय वेगळा अनुभव देई. सर्व चित्रपटगृह एकसारखी नसतात, काही खूपच वेगळी असतात आणि ते वेगळेपण त्यांची ओळख असते.

अलेक्झांड्रा चित्रपटगृह आज १०३ वर्षांचे झाले असते म्हणूनच हा फोकस. कामाठीपुरा, नागपाडा विभागात ते १४ सप्टेंबर १९२१ साली सुरू झाले.

मी दक्षिण मुंबईतील गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना कुलाब्यातील स्ट्रॅण्ड थिएटरपासून ताडदेवच्या डायना थिएटरपर्यंत सगळीकडेच पिक्चर एन्जॉय केला. आपल्या आजूबाजूचा समाज जो पिक्चर पाहतो तोच आपला असेच मानल्याने हाऊसफुल्ल गर्दीत कधीच हरवलो नाही आणि या प्रवासात मला जाणवले प्रत्येक थिएटर एकापेक्षा वेगळे. जुने गिरगावकर असाल तर बघा आठवून. डोळ्यासमोर आणा ते थिएटर डेकोरेशन आणि तिकीटासाठीची लांबलचक रांग.

अलेक्झांड्रा थिएटरची ओळख आणि संस्कृती अगदी भन्नाट आणि खरोखरच जगावेगळी. अगदी अनोखी.

आजच्या डिजिटल, मेट्रो ट्रेन, कोस्टल रोड युगातील चित्रपट रसिकांना मात्र हा अलेक्झांड्रा थिएटरचा अनोखा 'स्पॉट' नेमका कुठे होता हे सांगायलाच हवे. आता होताच म्हणायला हवे, कारण हे थिएटर २०११ साली बंद पडले, पण त्याची शंभरपेक्षा जास्त वर्षे जुनी इमारत आजही आपल्या जुन्या खाणाखुणा घेऊन उभी आहे. दक्षिण मध्य मुंबईतील नागपाडा कॉर्नरवरचे हे जुन्या काळातील चित्रपट रसिकांचे हमखास लक्ष वेधणारे असे थिएटर. नागपाडा, कामाठीपुरा, आग्रीपाडा, मुंबई सेंट्रल (जवळच माझगाव, भायखळा) अशा अतिशय दाट वस्तीच्या आणि सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या नागरिकांनी गजबजलेल्या अशा भागातील मध्यभागी हे थिएटर. एका बाजूने रेड लाईट एरियालगतच ही वास्तू. हीदेखील एक गोष्ट सांगायला हवीच. म्हणजेच पूर्वीचा चित्रपटगृहांचा जन्म सर्वस्तरीय होता हे लक्षात येते. चित्रपट अभ्यासक्रमात हेही यायला हवे. सामाजिकदृष्ट्या ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. (ती दुर्दैवाने दुर्लक्षित राहिलीय. चित्रपट रसिकांसमोर कसा पोहचला याचा जमेल तसा शोध यात आहे.) उच्चमध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू वर्ग या थिएटरपासून कायमच लांब राहिला. आपण येथे पिक्चर पहायला असे सांगणे त्याना कायमच डाऊन मार्केट वाटले असावे, मात्र या वर्गाला या थिएटरच्या कल्चरबद्दल कायमच कुतूहल. अनेक वर्षे इंग्लिश मीडियातून या थिएटरवर सतत काहीना काही लिहून येत राहिले हे या थिएटरचे यशच.

अलेक्झांड्रा थिएटरची 'विशेष दखल' घेण्याची ठळक कारणे म्हणजे, येथे प्रामुख्याने हॉलिवूडचे बी आणि सी ग्रेड चित्रपटाचे हिंदीत काही वेगळेच नामकरण करून ते प्रदर्शित होत आणि ते हिंदीतील नाव वाचण्यातही एक प्रकारचे मनोरंजन असे. (चित्रपट म्हटलं की अशा अगणित आणि त्यात काही अजब गोष्टी आहेत हे मी उगाच सांगत नाही. माझ्यासारख्या चित्रपट व्यसनींनी ते प्रत्यक्षात अनुभवलंय.) काही उदाहरणे अशी, 'डबल इम्पॅक्ट'चे केले होते, 'राम और श्याम', तर 'ब्रूस द लीजण्डस'चे केले होते, 'दादो का दादा ब्रूसली'. आणखी काही 'भाषांतरीत' नावे सांगायची तर, मेरा जिस्म मेरा बदन', अपनी मुर्गी को रखना संभाल, निक्कमा किया इस दिल ने, अंगूर का दाना हू मै, जवानी जानेमन हसीन दिलरुबा, Blow hot Blow coldचे आशुक गरम तो माशुक नरम, Rider on the rainचे बरसात मे ताक धीना धीन, spidermanचे हवा मे लटका दे सबको फटका, Gold Fingerचे सुनहरी हसीना असे अगदी काहीही हिंदीत करणे ही या थिएटरची खास ओळख. म्हटलं ना प्रत्येक थिएटरची आपली एक ओळख असतेच असते आणि फक्त तेवढे नाव वाचण्यासाठीही अलेक्झांड्राचा अनेकजण फेरफटका मारत. अशाच एका विदेशी चित्रपटाचे नाव 'बच्चे तो बच्चे बाप रे बाप'. अधूनमधून येथे ॲक्शनपॅक्ड मसालेदार देमार हिंदी पिक्चर, भोजपुरी पिक्चरही रिलीज होत. येथील पिक्चर कोणताही असो, त्यात काही वेगळेपण, दिग्दर्शकाचा टच, प्रतिकात्मक दृश्य, क्लासिक कॅमेरा वर्क अशा गोष्टींची अपेक्षा कधीच कोणी ठेवली नाही. मी तरी नाही. विशेष म्हणजे, बी आणि सी ग्रेड विदेशी पिक्चर इंग्लिश भाषेतच रिलीज होत आणि भाषा समजायला हवी असे काही नव्हतेच. असे विदेशी पिक्चर हिंदीत डब करण्याचे फॅड खूप नंतर आले. ते पूर्वी असते तर अलेक्झांड्रा आणखी हाऊसफुल्ल गर्दीत चालले असते, पण अनेकाना इंग्लिश भाषा समजत नव्हती तरी दृश्यातून पिक्चर समजत होते हे तर अलेक्झांड्राचे देणे.


**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

माझी या अलेक्झांड्रा थिएटरची ओळख कशी झाली? ते नाझ, ड्रीमलॅन्ड, रॉक्सी, मेट्रो, लिबर्टी, ऑपेरा हाऊस, अलंकार, मिनर्व्हा, नॉव्हेल्टी, शालिमार वगैरेसारखे मेन थिएटर अजिबात नव्हतेच. आमच्या गिरगावातील मध्यमवर्गीय कुटुंबात या थिएटरवर गप्पा होत नसत. इतकेच नव्हे तर या थिएटरमध्ये पिक्चर पहायला जाऊया असा घरात अजिबात विषय नसे. याचे कारण म्हणजे, तिकडचे विदेशी पिक्चर पाहण्यापेक्षा इरॉस, रिगल, स्टर्लिंगचे इंग्लिश पिक्चर पाहूया अशा गप्पा होत. मी अलेक्झांड्रा थिएटर सर्वप्रथम बेस्ट बसमधून पाहिले. लालबागचे सार्वजनिक गणेशोत्सवातील गणेशमूर्ती आणि देखावे पाहण्यासाठी सहकुटुंबाने जाण्याची खूपच जुनी परंपरा आहे. मीही ती अनुभवलीय. त्यात ६५ आणि ६९ या क्रमांकाच्या बसने लालबागला ये जा करताना या थिएटरवर हमखास नजर पडायची. अगदी जुन्या वळणातील थिएटर असले तरी त्यावरचे विदेशी चित्रपटाचे पोस्टर आणि त्याच्या नावाचे अजब हिंदीकरण हे गमतीदार वाटे. बराच काळ अलेक्झांड्रा इतकेच माहीत होते. नेमके बारावीला असताना मला महाराष्ट्र कॉलेज सेंटर आले आणि ते नेमके याच थिएटरसमोर. हा एक छान योगायोग होता आणि शेवटचा पेपर होताच याच अलेक्झांड्राचा पहिला अनुभव घेतला. पिक्चरचे नाव होते, कमीने मै तुझे जिंदा नहीं छोडूंगा. (तुम्हाला लगेच धर्मेंद्र आठवला असेल, पण हा त्याचा पिक्चर नव्हता. असाच कोणती तरी 'परदेशी' होता, पण वार्षिक परीक्षा संपल्यावर आणि समोरच थिएटर असल्याने अधिक तपशील कशाला हवे होते?) अप्पर स्टॉलचे एक रुपया पासष्ट पैशाचे तिकिट काढून आम्ही मित्र आत शिरलो ते एक भन्नाट अनुभव घ्यायला. त्या काळात सीटवर बसल्या बसल्या अगदी हक्काने पडद्यावरच्या हीरोला वगैरे एकाद्याने ओरडून सल्ला देणे नेहमीचेच (अशाच पब्लिकने आपल्या देशात पडद्यावरचा पिक्चर वाढवला. कदाचित ते तर्कसंगत नसलेही. पण तेच सत्य होते.) येथे फायटिंग (त्या काळातील प्रचलित शब्द ढिश्यॅव ढिश्यॅव) सीनला पब्लिकमधून मार सालेको... येथपर्यंत ठीक हो, पण तोंडानेही ढिश्यूम्म ढिश्यूम्म करायचं? पिक्चरशी एकरूप होणे असेही असू शकते. एकादा सीन लांबलाच तर पिक्चर आगे करोचा एकादा सल्लाही आला (तोपर्यंत व्हिडिओ कॅसेटचे युग आले नव्हते तरी असा सल्ला). ॲक्शन सीनला टाळ्या आणि शिट्ट्यांनी थिएटर दणाणून गेले.

अलेक्झांड्राचा हा माझा पहिला शो असा रोमांचक होता. अधूनमधून अशाच धमाल अनुभवासाठी येथे यायला हरकत नाही हे ठरवून टाकले. प्रत्येक वेळेस 'हा चित्रपट आपल्याला काय देतोय' याचसाठी आतूर असायला हवे असे नव्हे. कधी कधी पब्लिक आपल्याला कोणता अनुभव देतोय यासाठीही थिएटरमध्ये जायला हवे. (एका मराठी वृत्तपत्राची एक महिला प्रतिनिधी काही वर्षांपूर्वी याच एकूण अनुभवासाठी येथे गेली असे तिने त्यावर आवर्जून लिहिले. चित्रपट पाहणे आणि चित्रपटगृह अनुभवणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत हेच यातून दिसते.)




आजच्या बदामी गुलाबी आणि महागडचा काचेच्या मल्टीकलर मल्टीप्लेक्सच्या काळात हे अलेक्झांड्रा सिनेमा थिएटरचे कल्चर विचित्र वाटेल... आतमध्ये वेगळा फिल... पब्लिक तिकीट काढताक्षणीच पडद्याशी जोडला जायचा.. टाळ्या शिट्ट्यांची धमाल... गिरगावातून ६५वा ६९नंबरची बस पकडून तेथे जाताना कोणी पाहत नाही ना याची काळजी मात्र घ्यायचो. काही वर्षांपूर्वी timesMr alexandra cinema takes on new role as mosque ही बातमी वाचताना flash backमध्ये गेलो.. याच अलेक्झांड्रा थिएटरबद्दल माझे कुतूहल कायम राहिले. फार पूर्वी या थिएटरचे मालक होतेअब्दुल्ली युसूफ अली, तर ख्यातनाम चित्रकार एफ. एम. हुसैन यांनी एकेकाळी याच अलेक्झांड्राची पोस्टर रंगवलीत हे विशेष. गोल देवळाजवळच्या मोती सिनेमासमोरच्या गल्लीत हुसेनचा तो स्टुडिओ होता असे अधिक शोध घेतला असता समजले. या थिएटरच्या बाजूने दोन मिनिटांवरील कामाठीपुराच्या गल्लीतल्या फुटपाथवर भल्या पहाटे प्रत्येक शुक्रवारी चोर बाजारटाईप बाजार भरायचा. अक्षरशः चोरीचा माल.

इथे जुन्या रेकॉर्डस एक-दोन रुपयात मिळायच्या. साठ सत्तरच्या दशकात एक दोन रुपये फार कमी नव्हतेच. त्या काळात लाऊडस्पीकरचा धंदा करणारे हे त्यांचं गिर्हाईक. दिवस उजाडला की हे विक्रेते निघायचे.

कालांतराने अनेक एकपडदा चित्रपटगृह एकेक करीत बंद झाली. अनेकांच्या तर मूळ खाणाखुणा फक्त मागच्या पिढीतील चित्रपट रसिकांनाच माहित आहेत. अलेक्झांड्राची मूळ वास्तू आजही उभी आहे, पण शो केव्हाच थांबला आहे. माझ्यासारखेच अनेक चित्रपट व्यसनी आजही तेथून बेस्ट बसने (आता ६५ नंबरची बस बंद झालीय) हटकून अलेक्झांड्रा थिएटरवर हमखास नजर टाकतोच. ती आमच्या पिढीची सवय होती. गरज होती. एक वेगळाच अनुभव असे. एखाद्या विदेशी पिक्चरचे हिंदीतील नामकरण आम्हाला काही वेगळाच आनंद देई. आजही तसेच काही नजरेत पडेल असे वाटते, पण तसे होत नाही. आज हे थिएटर सुरू असते तर त्याचे वय १०३ वर्षे असते. आज येथील पडद्यावर खेळ होत नसला तरी ही इमारत १०३ वर्षांची आहे. जुन्या मुंबईवर फोकस टाकताना हा संदर्भ खूपच महत्त्वाचा आहे.

मी फक्त चित्रपट पाहत पाहत सिनेपत्रकारिता केली नाही तर चित्रपटगृह आणि त्यातील रसिक यांच्यातील एक राहिलो. आपल्या देशातील चित्रपट संस्कृती व त्याचा प्रेक्षक जगावेगळा आहे आणि त्याला दाद द्यायलाच हवी. अलेक्झांड्रा थिएटर एक झक्कास उदाहरण आहे.

---

## प्रधानमंत्री पीक विमा योजना शेतकऱ्यांना आधार

नैसर्गिक आपदांमुळे शेती क्षेत्रात अनेक अडचणी निर्माण होतात. अवेळी पाऊस, ओला दुष्काळ, पिकांवर पडणारे विविध प्रकारचे रोग आदींमुळे शेतकऱ्याला हाती आलेले पीक मिळू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. या सर्व गोष्टींचा विचार करून पिकासाठी विमा काढण्याचा निर्णय शासनाने घेतला. या पिक विम्याचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना होत आहे. पूर्वी शेतकऱ्यांना पीक विम्याच्या हप्त्याची रक्कम द्यावी लागत होती. आता तर राज्य शासनाने एक रुपयात पीक विमा शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे बळीराजाला मोठा आधार मिळाला आहे.

पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत विमा हप्त्याच्या दोन टक्के/नगदी पिकांसाठी पाच टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरण्याची तरतूद आहे. विमा हप्त्याचा भारही शेतकऱ्यांवर न ठेवता त्यांच्या हिश्श्याचा विमा हप्ता भरून शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने पीक विमा योजना खरीप २०२३पासून राबविण्यास मान्यता दिली आहे. राज्यातील एक कोटी ७१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत नोंदणी केली होती. ९६ लाख ४४ हजार शेतकऱ्यांना पाच हजार २६१ कोटी पाच लाख रुपये विमा रक्कम अदा करण्यात आली आहे. खरीप २०२४साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही १४ पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत.

शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के व नगदी पिकांसाठी पाच टक्के असा किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जो कमी असेल तो राहील. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनेनूसार केंद्र शासन कोरडवाहू जिल्ह्यातील पिकांना ३० टक्के व बागायती जिल्ह्यातील पिकांना २५ टक्केच्या मर्यादेत त्यांचा समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय विमा संरक्षण हे पिकनिहाय प्रति हेक्टरी मंजूर कर्ज मर्यादेपर्यंत देय राहील.


**-दत्तात्रय कोकरे, वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)**

---

# निसर्गसंपन्न (स्वर्णीम) कोकण

निसर्ग सौंदर्याने नटलेला कोकण प्रांत आपल्या देशातीलच नव्हे तर विदेशी पर्यटकांनाही भावणारा आहे. गोव्यापेक्षाही काकणभर सरस अशा या प्रदेशात सुंदर अरबी समुद्राचा रमणीय विस्तीर्ण किनारा, तर दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या दुर्गम पर्वतरांगांनी या प्रदेशावर सौंदर्याची मुक्त हस्ते उधळण केली आहे.





वर्षभर हिरवीगार असलेली वनश्री, गिरीशिखरे, मंदिरे, ऐतिहासिक स्थळे, जलदुर्ग, उंच डोंगरमाथ्यावरून घडणारे सागराचे विलोभनीय दर्शन, पावसाळ्यात डोंगरकड्यावरून कोसळणारे धबधबे, स्वच्छ आणि विस्तृत अशी सागर किनारपट्टी या भागाला लाभली आहे. इथले रीतिरिवाज, बोलीभाषा, आहार, दशावतारासारख्या सांस्कृतिक लोककला या सर्व आगळ्यावेगळ्या आहेत. हौशी प्रवाशांना जसा इथला निसर्ग मोहिनी घालतो तसाच सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक गोष्टी जिज्ञासूंना रमवू शकतील अशी कितीतरी ठिकाणे कोकणात आहेत.

१९५०च्या सुमारास भारत सरकारने खनिज संपत्तीचा आढावा घेतल्यानंतर कोकणातील रेडी या गावाकडे उद्योजकांचे लक्ष गेले, कारण येथे काळे सोने अर्थात खनिज मोठ्या प्रमाणात सापडले तसेच आसपासचा परिसर साटेली, कळणे, तलवणे, आजगाव (धाकोरे) येथून खनिज आणून रेडी बंदरमार्गे परदेशात निर्यात केले जाऊ लागले. रेडीत उषा इस्पात नावाचा पोलाद निर्मितीचा उद्योग निर्माण झाला होता. रेडीपासून गोव्याची सीमा दोन किलोमीटर आहे. गोवा मुक्तीसंग्रामावेळी सत्याग्रही तुकड्या याच रेडीमार्गे तेरेखोल येथे गेल्या होत्या. १९५६ साली रेडी गोवा हद्दीवर पनवेलच्या हिरवे गुरुजींनी बलिदान दिले.

सोळाव्या शतकामध्ये विजापूरच्या आदिलशहाने रेडी येथे समुद्र किनारी महाराष्ट्राच्या दक्षिण टोकास मोक्याच्या ठिकाणी बळकट असा बांधलेला किल्ला यशवंत गड आजही दिमाखात उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६२मध्ये हा किल्ला जिंकून घेतला आणि रेडी, शिरोडा आदी विस्तृत टापूवर आपली सत्ता स्थापित केली. मालवणचा सिंधुदुर्ग किल्ला शिवरायांनी बांधला तसेच सर्जे कोट किल्ला, विजयदुर्गाचा समुद्र किनारी असलेला किल्ला, देवगड किल्ला असे अनेक गडकोट किल्ले पर्यटकांचे आकर्षण ठरले आहेत. देवगड येथील हापूस आंबा बागा, पोफळीच्या बागा, नारळाची उंच झाडे, माडांच्या बागा कोकणात जागोजागी पहावयास मिळतात.

कोकणातील बोलीभाषा मालवणी ऐकायला गोड आणि लोकप्रिय अशीच आहे. मालवणी नटसम्राट कै. मच्छिंद्र कांबळी यानी ही भाषा त्यांच्या 'वस्त्रहरण' नाटकाद्वारे सातासमुद्रापार नेली आहे. त्यामुळे मालवणी बोलीभाषेचा डंका चित्रपट, नाटक, मालिकांमध्ये वाजतो आहे. कथा, कविता निर्माण होत आहेत.

पावसाळ्यात तर कोकणाचे सौंदर्य आणखी खुलून जाते. आंबोली येथील महाकाय धबधबा, दऱ्या पाहण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडते. बेळगाव (कर्नाटक), गोवा राज्यातून तसेच महाराष्ट्र येथून वर्षासहलीसाठी येथे येतात तसेच सावडाव, कणकवली नापणे वैभववाडी, फोंडाघाट येथील धबधबे, दऱ्या पाहून मन प्रसन्न होते. पावसाळ्यातील चार महिने या ठिकाणी पर्यटकांची वर्दळ असते.

कोकणातील जनता शांत, प्रामाणिक, धार्मिक वृत्तीची, धाडसी असूनही पापभिरू आहे. भजन, कीर्तन, दशावतार, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ यासारख्या लोककलेतून वेद, उपनिषदे, धार्मिक ग्रंथ संस्कृतीचे संवर्धन आणि संगोपन कोकणी माणूस आजदेखील करत आहे. येथील गणेशोत्सव तर धूमधडाक्यात साजरा होतो. प्रत्येकाच्या घरी गणपती बाप्पा विराजमान झालेले असतात. मोदक, नेवऱ्या, (करंज्या), लाडू, पंचखाद्य याची रेलचेल असते. दहा-अकरा दिवस आनंदाला उधाण आलेले असते. भजनी मंडळींचे वाड्यावाड्यांमधून भजनसूर ऐकावयास मिळतात.

कोकणातील संत परंपरा मोठी आहे. येथील लोक श्रद्धावान आहेत. कोकणात कधीही जातीय, धार्मिक दंगली झाल्याचे ऐकिवात नाही. याचे महत्त्वाचे कारण हेही असू शकते की येथील धार्मिक परंपरा जोपासली जाते. विशाल मानवतावादी दृष्टिकोनातून जगाचा विचार करणारी संताची मांदियाळी येथे झाली आहे. माणगावचे वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी, इन्सुली बांदा येथील सोहिरोबा नाथ आंबिये, तळवणे येथील परशुराम भारती, दानोलीचे साटममहाराज, मालवणचे रांगोळीमहाराज, पू. नाटेकर आजी, पिंगुळी कुडाळचे राऊळमहाराज, कणकवलीचे भालचंद्रमहाराज, सावरवाडचे राणेमहाराज, मळगावचे गोपळबोधमहाराज असे अनेक संत महात्मे या कोकण भूमीत होऊन गेलेत.

देवस्थान, जत्रा, मंदिरे यासाठी कोकण प्रसिद्ध आहे. रेडी येथील पांडवकालीन द्विभुज गणेशमूर्ती दृष्टांत देऊन सापडली आहे. याला जवळ जवळ २५ वर्षे होऊन गेली. आता तेथे भव्य मंदिर बांधले आहे तसेच माऊली मंदिर प्रत्येक गावात असते. आरवली, आजगवचा वेतोबा, आंबडपाल येथील कालिका मंदिर, देवाचा डोंगर येथील नवनाथ मंदिर, अशी अनेक मंदिरे कोकणात आहेत. आंगणेवाडीची जत्रा, कुणकेश्वर जत्रा, सोनुर्ली माऊली जत्रा, प्रत्येक गावातील वाडीच्या देवाची जत्रा मोठ्या उत्साहात भरवली जाते. राजापुरात येणारी गंगा भाविकांची पर्वणीच असते.

अशा या सुवर्ण (स्वर्णीम) निसर्ग सौंदर्याने नटलेल्या प्रदेशाचा कोकणी भागाचा, कोकणवासीयांचा विकास मात्र अजून म्हणावा तसा झाला नाही. कोकणचा कॅलीफोर्निया करण्याचे आश्वासन हवेत विरून गेले असल्याचे जाणवते. कोकणचा कॅलिफोर्निया व्हायचा तेव्हा होऊ दे, पण आधी येथील विकास महत्त्वाचा आहे. मुंबई-गोवा महामार्गा पूर्ण झाला की, आणखी पर्यटकांचा ओघ वाढणार... कोकणचे वैभव वाढणार एवढे मात्र नक्की!

**-दिलीप रेडकर, पनवेल**

# राहुल गांधींवर गुन्हा दाखल करा

**◆ कर्जत येथे मागणी ◆ आरक्षण संपवण्याच्या वक्तव्याचा निषेध**

**कर्जत : प्रतिनिधी**

देशात मागासवर्गीयांना देण्यात आलेले आरक्षण काढून घेण्यात यावे, असे वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले आहे. त्या वक्तव्याचा आरपीआय आठवले गटाकडून कर्जत येथे निषेध करण्यात आला. निवेदन देवून राहुल गांधी यांच्यावर संविधानाच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.



या देशाचे घटनाकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, आदिवासी, ओ.बी.सी, मागास तसेच अन्य जाती धर्मियांना संविधानाद्वारे आरक्षण दिले आहे. ते आरक्षण काढण्यात यावे. अशी वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिका भेटीत केली आहेत. त्यामुळे राहुल गांधी यांच्या या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी कर्जत आरपीआय आठवले गट कर्जत पोलीस ठाणे येथे जमले होते. या वेळी बोलताना शहर अध्यक्ष अरविंद मोरे यांनी संविधानाने दिलेले आरक्षण कोणीही संपवू शकत नाही. असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्षे ११ महिने आणि १७ दिवस अहोरात्र मेहनत घेऊन या देशाला संविधान प्राप्त करून दिले. त्या संविधानात गरीब शोषित वंचित मागास समाजाला आरक्षण दिले आहे, मात्र काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संपविण्याचे बेताल वक्तव्य केले. त्यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया शाखा कर्जत यांच्या वतीने जाहीर निषेध करीत आहोत.

या वेळी आरपीआय आठवले गटाकडून कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी स्वीकारले. त्यावेळी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष किशोर गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष जयेश शिंदे, युवकचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. उत्तम गायकवाड, तालुका सचिव राहुल गायकवाड, माजी कार्याध्यक्ष भगवान जाधव, अशोक गायकवाड, भालचंद्र गायकवाड, कर्जत शहर महिला अध्यक्ष वैशाली भोसले, महिला पदाधिकारी चिकने, तालुका महासचिव मनोज गायकवाड आदी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये विसर्जनस्थळी अंधार



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये पाच दिवसांचा गौरी गणपती विसर्जनस्थळी वीज नसल्याने गणेश भक्तांना अंधारात चाचपडत गणेश विसर्जन करावे लागले. यामुळे येथील स्थानिकांनी पालिका प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

माथेरान नगरपालिकेमार्फत विसर्जनस्थळी जाणाऱ्या रस्त्याला आणि विसर्जनस्थळी वीज पुरवठा करण्यात येतो, मात्र पाच दिवसांच्या गणपती विसर्जनवेळी येथे सुरळीत वीज पुरवठा नसल्याने अनेक गणेश भक्तांना अंधारात गणेश मूर्तींचे विसर्जन करावे लागले. त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांनी पालिका प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे तसेच पालिके मार्फत येथे अनेक वर्षांपासून एकाच ठेकेदाराला वीज साहित्य पुरवठा करण्याचा ठेका दिला असून ठेकेदार केव्हाच उपलब्ध होत नसून

> **माथेरानमध्ये पाच दिवसांचे एकूण ६४ गणपती होते. मिरवणुकीतून गणपती विसर्जनस्थळी पोहचण्यास सायंकाळी झाली, मात्र पालिकेकडून तिथे वीज पुरवठा नसल्याने अंधारात गणपती विसर्जन करावे लागले. याबाबत आम्ही लवकरच मुख्याधिकारी यांची भेट घेणार आहोत.**
>
> **–प्रवीण सकपाळ,**
> **भाजप शहर अध्यक्ष, माथेरान**

माथेरान शहरातील अनेक भागातील वीज पुरवठा वीज साहित्य अभावी पूर्णपणे बंद अवस्थेत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराकडून हा ठेका तत्काळ काढून घ्यावा, अशी मागणीदेखील येथे केली जात आहे.

विसर्जनस्थळी सुरळीत वीज पुरवठा नसल्याने येथील स्थानिक नागरिक पुढील दिवसांत पालिका प्रशासकांची भेट घेणार असल्याचे बोलले जात आहे. पर्यटनस्थळी अश्या प्रकारची परिस्थिती ही पर्यटनाच्या दृष्टीने खूप घातक असून याचा परिणाम येथील पर्यटनावर दिसून येत आहे.

## नागरिकांनी सण-उत्सवात कायदा सुव्यवस्था राखावी; रोहा पोलिसांचे आवाहन

**रोहे : प्रतिनिधी**

नागरिकांनी सण उत्सवात कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम करावे, असे आवाहन रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर केले.



रोहेकर नागरीक सुज्ञ व समंजस आहेत. सर्व सण गुण्यागोविंदाने व आनंदाने साजरा करतात. प्रत्येक धर्मा विषयी आदर असणे आवश्यक आहे. गणेश मंडळांनी गणपती मिरवणूकीत महीलांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. फटाके वाजवताना काळजी घ्यावी, देखावे आक्षेपार्ह नसावे, मिरवणुकीत काळजी घेवुन कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येकांने काम करण्याची आवश्यकता आहे.

मिरवणूकीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त असणार आहे. मुस्लीम बांधवांचा ईद–ए–मिलाद सण पवित्र सण असुन मुस्लिम बांधवांनी ही काळजीची घेण्याची आवश्यकता आहे. सण उत्सव दरम्यान समाज माध्यमाचा गैर वापर होता कामा नये. मुले मोबाईलवर काय करत आहे हे पालकांनी पहाणे आवश्यक आहे. अशा सुचना दौंडकर यांनी आगामी गणपती विसर्जन व ईद–ए–मिलाद या पार्श्वभूमीवर रोहा पोलीस ठाण्यात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत व्यक्त केले.

पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांनी सण उत्सव शांतता राहाण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे रोहयात शांतता आहे. कोणता अनुचीत प्रकार घडु नये यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न करावे, असे सांगितले.

या वेळी अहमद दर्जी, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, डॉ. फरीद चिमावकर, महेश रोकडे, रियाज शेटे, आशिष जंगम, समिर दर्जी, विकास शिंदे, विलास सोलंकी, सुशील रेळेकर, पोलीस पाटील अध्यक्ष कासारे, अनिल घरजाळे, वैभव कुलकर्णी, गोपनिय पोलीस जयेंद्र पेडवी, यशवंत जंगम, राम सावंत, गायकर, अहीरे, यासह शांतता समितीचे सदस्य, पोलीस पाटील व पत्रकार उपस्थित होते.

## माझी शाळा सुंदर शाळा अभियानात आशा किरण इंग्लिश स्कूल प्रथम

**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात क्रमांक २मध्ये तालुकास्तरावर घेतलेल्या स्पर्धेत खाजगी व्यवस्थापनामधील आशा किरण इंग्लिश स्कुल पानेड या शाळेने प्रथम क्रमांकाचा बक्षीस मिळवल आहे.



राज्यातील शाळा सुंदर बनाव्या, शाळेच्या भिंती बोलक्या व्हाव्या, शाळेत विविध अभिनव उपक्रम राबविले जावेत, मुलांना अभ्यास करताना आनंद मिळावा, या उद्देशाने शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान राज्यात राबविले जात आहेत.

आशा किरण इंग्लिश मिडीयम स्कुल नेहमीच विविध उपक्रमाबाबतीत चर्चेत असते या स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना इतर स्पर्धेची जाणीव व्हावी यासाठी कराटी, फुटबॉल, कला, करिअर मार्गदर्शन वर्ग घेतले जातात तसेच या शाळेची प्रगती पाहून सह्याद्री प्रतिष्ठान यांच्यामार्फत नुकतेच उत्कृष्ट किताब देण्यात आला होता.

शाळेमध्ये उत्कृष्ट दर्जेदार व संस्कार युक्त शिक्षण, उच्च शिक्षित अध्यापक वर्ग, भव्य इमारत, प्रशस्त मैदान, संगणक कक्ष, वाचनालय, प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, वार्षिक विज्ञान प्रदर्शनी, स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल, स्काऊड गाईड कॅम्प, भौगोलिक क्षेत्र भेट, वैद्यकीय तपासणी अशा विविध सुविधा शाळेत उपलब्ध आहेत. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थी नेहमीच शैक्षणिक व स्पर्धेत सक्रिय असतात तसेच नेपाळ देशात आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले आहे तर शिष्यवृत्ती परीक्षेत भाग घेत आहेत.

शाळेची शाळा व्यवस्थापन कमिटी, मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी आणि शाळेला मदत करण्यास नेहमी तत्पर असलेले शाळेचे हितचिंतक यांच्यामुळे शाळेची प्रगती होत आहे, असे या वेळी शाळेचे मुख्याध्यापक यांनी सांगितले.

## शहर स्वच्छतेसाठी सर्वांचा सहभाग आवश्यक –आमदार महेंद्र थोरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहर आपले आहे व ते स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपरिषदबरोबर आपली सर्वांची जबाबदारी आहे, शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही. शासनाच्या वतीने घनकचरा प्रकल्पासाठी दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असे प्रतिपादन कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोली येथे केले.



खोपोली नगर परिषद हद्दीतील घनकचरा संकलन वाहतूक व प्रोसेसिंग करणे या कामाचा शुभारंभ शनिवारी (दि. १४) आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या वेळी मुख्याधिकारी पंकज पाटील, उपमुख्याधिकारी गौतम भगले, याचबरोबर शिवसेना संपर्कप्रमुख पंकज पाटील, खोपोली शहर प्रमुख संदीप पाटील, महिला आघाडीच्या प्रिया जाधव, जिनी सॅम्युअल, माधवी रिटे, ज्येष्ठ माजी नगरसेवक मोहन अवसरमल, रॉबिन सॅम्युअल, अनिल मींडे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, सहकार सेनेचे हरीश काळे, दिनेश थोरवे, तात्या रिटे, विवेक पाटील, ईश्वर शिंपी, यासह शिवसेनेचे शहर पदाधिकारी, तसेच नगरपरिषद अधिकारी वर्ग व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार थोरवे पुढे म्हणाले की, या शहराचा सर्वांनाच भेडसावणारा कचऱ्याचा प्रश्न होता हा प्रश्न आता निकाली काढण्यासाठी शासनाचा निधी उपलब्ध करून दिला आहे व ठेकेदारांच्या माध्यमातून घनकचरा प्रश्न निकाली निघेल असा विश्वास थोरवे यांनी व्यक्त केला, या शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शहर स्वच्छ असेल तर पर्यटनालाही चालना मिळेल व शहराचा आर्थिक स्तर उंचावेल असा पण त्यांनी विश्वास व्यक्त केला, या शहराच्या स्वच्छतेबाबत सर्वांनी सामुदायिक जबाबदारी घेऊन आपले शहर कसे स्वच्छ राहील यासाठी नगर परिषदेस सहकार्य करावे, असेही आवाहन थोरवे यांनी भाषणात केले. नियुक्त केलेले ठेकेदार एक महिन्यात आपला कामाचा दर्जा चांगला देतील असाही त्यांनी सांगितले.

प्रारंभी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सर्व मान्यवरांचे उपस्थित आमचे स्वागत केले व आपल्या प्रास्ताविक भाषणात घनकचरा प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती दिली. या प्रकल्पासाठी कचरा संकलनासाठी १६ वाहनांची व्यवस्था असणार आहे. नागरिकांनी शहर स्वच्छ ठेवण्यासंदर्भात सहकार्य करावे असेही आवाहन केले. नगर परिषदेचे अनेक प्रकल्प आहेत त्यासाठी आमदार साहेबांनी शासनाच्या वतीने निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती केली. नगर परिषदेच्या वतीने आमदार थोरवे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

दरम्यान, कार्यक्रमापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती आमदार थोरवे व मुख्याधिकारी पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुर्वे यांनी मानले. कार्यक्रमस्थळी आमदार थोरवे उशिरा आल्याने त्यांनी दिलगिरी व्यक्त केली.

## माणगावजवळ दुचाकींची धडक; चार जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

दोन दुचाकींमध्ये धडक लागून झालेल्या अपघातात चार जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. हा अपघात गुरुवारी (दि.१२) सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास माणगावजवळील ढाळघर गावच्या हद्दीत जवळ मुंबई–गोवा महामार्गावर घडला. या अपघाताची फिर्याद स्नेहल चंद्रकांत दळवी (वय २४, रा.बोरिवली मुंबई) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघाताच्या गुन्ह्यातील आरोपी आकाश शशिकांत गुगले (वय२६,रा. निळगुण ता. माणगाव) व त्यांच्या पाठीमागे बसलेला त्यांचा सहकारी असे त्यांच्या ताब्यातील स्प्लेंडर मोटार सायकल हि गाडी मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरून भरधाव वेगाने चालवीत घेऊन जात असताना अपघात ठिकाणी आल्यावर स्कुटीला पाठीमागून धडक देऊन अपघात घडला.

या अपघातात स्नेहल चंद्रकांत दळवी (वय २४, रा.बोरिवली मुंबई), साक्षी बबन शेलार (वय २२, रा.पाचोळे ता.माणगाव), सागर लक्ष्मण झूमरे (वय २८, रा.जोर ता.माणगाव), प्रकाश शशिकांत गुगले (वय २६,रा. निळगुण ता.माणगाव) हे चार जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात एसटी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काळे हे करीत आहेत.

## ईद–ए–मिलादची सुट्टी कायम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात मुस्लिम बांधव व पोलीस अधिक्षक रायगड यांचेशी झालेल्या चर्चेनुसार ईद–ए–मिलाद निमित्ताने सोमवारी (दि.१६) राज्य शासनाने जाहीर केलेली सार्वजनिक सुट्टी कायम ठेवण्यात आली आहे.

राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्टयांमध्ये ईद–ए– मिलाद या सणाची सोमवारी दर्शविण्यात आलेली सार्वजनिक सुट्टी रायगड जिल्हयामध्ये नवीन अधिसूचनेद्वारे कायम ठेवण्यात आली आहे. याची सर्व शासकीय निमशासकीय कर्यालयानी आणि संबंधितानी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांनी कळविले आहे.



**माणगाव : राष्ट्रवादी काँग्रेसच्या रायगड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुभाष केकाणे यांचे उद्योजक विजयशेठ मेथा यांनी अभिनंदन केले.** (छाया : सलीम शेख)

## माणगावात एसटी बसची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

एसटी बसची पाठीमागून दुचाकीला धडक लागून झालेल्या अपघातात दोन जण जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघात गुरुवारी (दि. १२) माणगाव येथील हॉटेल कार्तिक जवळ मुंबई–गोवा महामार्गावर घडला. या अपघाताची फिर्याद मंदार शंकर भद्रिके (वय ३०, रा.जोर ता.माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघाताच्या गुन्ह्यातील आरोपी एसटी बस चालक देविदास पुंडलिक चव्हाण (वय ३४, रा.बस डेपो,खेड, जि.रत्नागिरी) यांनी त्यांच्या ताब्यातील नालासोपारा ते खेड हि एसटी बस क्र.एम.एच.०८/ए.पी–५८२५ हि गाडी मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाने भरधाव वेगाने चालवीत घेऊन जात असताना पाठीमागून बुलेट मोटारसायकल (एम.एच.४७/एम–२६१५) या गाडीला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात दुचाकीवरील शंकर नामदेव भद्रिके (वय ७०) व अंकुश शंकर भद्रिके (वय ३०) दोन्ही रा.जोर ता.माणगाव हे दोघे जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात एसटी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सानप हे करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**मौजे नेरे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | स.नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू=पैसे Rs=Ps |
|---|---|---|---|
| १) श्रीधर दत्तात्रय पाटील<br>२) स्वप्ना श्रीधर पाटील | २५३/१ | ०.११.१० | १.१९ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. अमोल पवार**
पत्ता : पहिला मजला, अश्वमेध, सेक्टर १२,
प्लॉट १२, नवीन पनवेल जि.रायगड
४१० २०६, मो. क्र. ९८३३७३७९२२



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः–

**मौजे–अरिवली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७०/१ | एकूण क्षेत्र ०–४१–००<br>पैकी ०–४०–०० | ३.१७ | **निहाल आझम पानसरे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १४/०९/२०२४.**

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

## निवडक

### बांगलादेशी महिलेविरोधात गुन्हा

**पनवेल :** देवद येथे राहणाऱ्या शबीना अफसर शेख (वय ४९) या बांगलादेशी महिलेविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. देवद येथे बांगलादेशी महिला राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ११ सप्टेंबर रोजी युनायटेड होम सोसायटी, देवद या ठिकाणी पोलीस पथकाने जाऊन पाहणी केली. या वेळी बीना अफसर शेख या महिलेकडे भारतीय वैध कागदपत्रे आणि पासपोर्टची मागणी केली. या वेळी तिने कागदपत्र नसल्याचे सांगितले आणि दहा वर्षांपासून भारतात अवैधरित्या राहत असल्याचे मान्य केले. तिचे मूळ गाव डंगा, पोलीस ठाणे कालिया, जिल्हा जशोर, बांगलादेश असे सांगितले.

### एटीएम कार्ड चोरून पैसे काढले

**पनवेल :** एटीएम कार्डची चोरी करून खात्यातून पन्नास हजार रुपयांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नंदा पांडोळे ह्या शिवमंदिर शिवनगर, देवद येथे राहतात. त्यांना लोन देतो असे सांगून एका इसमाने आधार कार्ड व पॅन कार्ड, एटीएम घेऊन फॉर्मवर सही घेतली. त्यानंतर त्यांच्याकडील तीन हजार ६०० घेऊन बँक खात्यात कर्जाचे पैसे जमा होतील, असे सांगितले. त्यानंतर त्या बँकेत पैसे काढण्यासाठी गेले असता पर्स मध्ये एटीएम कार्ड सापडून आले नाही. त्यांनी पासबुकमध्ये एन्ट्री केली असता खात्याचे एटीएम मधून कोणीतरी दोन दिवसात ५० हजार रुपये काढून देण्याचे समजले. या वेळी लोन करून देणाऱ्या अनोळखी इसमाने ते कार्ड चोरून नेल्याची त्यांची खात्री झाली.

### मारहाण करून लुटले

**पनवेल :** मोटरसायकलची कारला ठोकर लागल्याने कार मधील तीन ते चार व्यक्ती खाली उतरले आणि मोटर सायकल चालकाला मारहाण केली. त्यानंतर त्याच्याकडून ९२ हजार रुपये आणि मोबाईल घेऊन ते वैद्यकीय मदत न करता पळून गेले. याप्रकरणी कारचालक आणि मारहाण केलेल्या व्यक्तीविरोधात तळोजा पोलीस ठाणे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद मुनोवर नूर मोहम्मद सय्यद हा घोटगाव येथे राहत असून तो कुत्र्यांना जेवण वाटप करत येत असताना तळोजा हायवे रोड धानसर ठाकूरपाडा येथे आला असता पेट्रोल पंपासमोर सफेद रंगाच्या कारला मोटरसायकलची ठोकर लागली. त्यामुळे तो खाली पडला. या वेळी कारमधून तीन ते चार व्यक्ती खाली उतरले त्यांनी सय्यद यांना मारहाण व दमदाटी करून कारचे नुकसान झाले आहे असे बोलून भरपाई दे सांगून ९२ हजार रुपये आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल घेतला. या वेळी जखमी मोहम्मद मुनोवर याला वैद्यकीय मदत न करता ते निघून गेले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# नवी मुंबईत राहुल गांधींविरोधात आंदोलन

## संविधानविरोधी भूमिकेचा भाजपकडून जळजळीत निषेध

**नवी मुंबई : बातमीदार**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या संविधान विरोधी भूमिकेचा माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनामध्ये जळजळीत निषेध करण्यात आला.

नवी मुंबई भाजप जिल्हा युवा मोर्चा आणि अनुसूचित जाती मोर्चा यांच्या वतीने हे आंदोलन ऐरोली येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळ करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला नमन करून राहुल गांधी यांच्या आरक्षण विरोधी



वक्तव्याचा धिक्कार करण्यात आला. जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित मेढकर, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष राजेश शिंदे, स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या या आंदोलनामध्ये भाजपचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधानिक आरक्षण बंद पाडण्याचा राहुल गांधी यांचा डाव भाजप हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा अमित मेढकर यांनी दिला. राहुल गांधी यांची संविधान विरोधी भूमिका पुन्हा एकदा जगासमोर आली असून त्यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी राजेश शिंदे यांनी केली. राहुल गांधी यांनी माफी मागितली नाही तर यापेक्षाही उग्र आंदोलन केले जाईल, असा इशारा नवीन गवते यांनी दिला.

# अतिक्रमणावर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव, सेक्टर - ९, ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरू केले होते. अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती.

संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१५९१/२०२३ च्या आदेशानुसार १ ते ५ व्या मजल्यावरील एका बाजुचे स्लॅबचे बांधकाम निष्कासीत करण्यात आले आहे.

या ठिकाणी पोकलेन, जेसीबी सारखी मशनरी जावु शकत नसल्याने या मोहिमेसाठी सहा हॅमर, आठ ब्रेकर, व १२ मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# अटल सेतू मार्गावरून एनएमएमटीची धाव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाचे अर्थात एनएमएमटीचे वातानुकूलित अतिजलद नवीन बसमार्ग क्र.११६ नेरूळ बस स्थानक (पूर्व) ते मंत्रालय मार्गे उलवे, शिवाजीनगर टोल नाका तसेच बसमार्ग क्र.११७ खारघर से.३५ ते मंत्रालय मार्गे पनवेल, पळस्पे, गव्हाण टोल नाका अशी बससेवा अटल सेतू या मार्गावरून गुरुवार(दि. १२)पासून तुर्भे आगारातून सुरू करण्यात आली.



या मार्गाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत. बस मार्ग क्रमांक ११६ - प्रवर्तन - तुर्भे आगार, बससंख्या - ०१ वातानुकूलित, प्रवासकाळ- ९५ ते १०० मिनिटे, प्रवर्तन काळ - सोमवार ते शनिवार, प्रवास भाडे - रु.२३०/-, प्रवासमार्ग - नेरुळ बसस्थानक, सागरदिप सोसायटी / शुश्रूषा हॉस्पिटल, आगरी कोळी संस्कृती भवन, से.४२ ए बस स्थानक / गायमुख चौक, नमुंमपा मुख्यालय, मोठा उलवा गाव, शगुन रियालटी चौक, बामणडोंगरी रेल्वे स्थानक, उलवे प्रभात हाईट्स, शिवाजीनगर / अटल सेतू टोल नाका, शिवडी-न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / डॉ.बाबासाहेव आंबेडकर चौक, एल.आय.सी. / मंत्रालय डाउन., प्रवासस्थान - नेरुळ बसस्थानक ते मंत्रालय - ७.५५, मंत्रालय ते खारकोपर रेल्वे स्थानक - ९.४५, खारकोपर रेल्वे स्थानक ते मंत्रालय -१७.२०, मंत्रालय ते नेरुळ बस स्थानक - १८.२५, बस मार्ग क्रमांक ११७ - प्रवर्तन - तुर्भे आगार, बससंख्या - ०१ वातानुकूलित, प्रवासकाळ- ११५ ते १०० मिनिटे, प्रवर्तनकाळ - सोमवार ते शनिवार, प्रवासभाडे - रु.२७०/-, प्रवासमार्ग - खारघर से. ३५ सर्कल उत्सव चौक, स्पॅगेटी / घरकुल, कळंबोली सर्कल, आसुडगाव आगार, पनवेल एसटी बस स्थानक, भिंगारी, पळस्पेफाटा, महात्मा फुले विद्यालय / करंजाडे फाटा, गव्हाण टोलनाका, शिवडी - न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / बाबासाहेब आंबेडकर चौक, एल. आय. सी / मंत्रालय (डाऊन), प्रवास स्थानक - खारघर से.३५ ते मंत्रालय - ७.४०, मंत्रालय ते खारघर से.३५ येथे रात्री १८. १५ मिनिटांनी पोहचणार आहे.

नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

# बेशुद्ध पडलेल्या वृद्ध महिलेस आधार



**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ८ येथील कोहिनूर कॉर्नर येथे एक वृद्ध महिला चक्कर येऊन बेशुद्ध पडली होती. त्याचवेळी तिथून जाणाऱ्या शिंदे गटाच्या राजश्री येवले तातडीने त्या महीलेजवळ धाव घेतली. काही नागरीकांना थांबवून त्यांचा आधार घेत महिलेला रस्ता कडेला सावलीत नेऊन त्यांना आधार दिला.

शांताबाई मौर्या असे महिलेचे नाव असून या महिलेला तिच्या मुलीकडे स्वाधीन करत पुढील उपचारासाठी वाशी रुग्णालय पाठवून दीले. शिंदे गटाच्या सानपाडा, नेरूळ विभाग संपर्क प्रमुख राजश्री येवले या त्यांच्या कार्यालयातून जात असताना, त्यांना ही महिला दिसली. आजूबाजूने अनेक नागरीक जात होते, मात्र कोणीही माणुसकी न दाखवता बघून निघून जाताना दिसून आले. येवले यांनी महिलेकडे धाव घेतली. त्यांनी पाहिले असता त्या बेशुद्धावस्थेत होत्या. लागलीच येवले यांनी काही नागरीकांना थांबवून त्यांच्या साहाय्याने रस्त्याच्या कडेला सावलीत नेले. त्यावेळी ही महीला कचरा वेचक असल्याचे आढळून आले. त्या महीलेला उठवून चेहऱ्यावर पाणी शिंपडल्याने महीला शुद्धीवर आली. तिला येवले यांनी पाणी प्यायला दीले. बिस्कीट खाऊ घातले. त्यामुळे महिलेला काहीसे बळ मिळाले.

शुद्धीवर आलेल्या त्या महिलेला आपले नाव तसेच कुठे राहतो हे सांगता येत नव्हते. त्यामुळे मोठा प्रश्न निर्माण झाला होता, मात्र बरीच विचारपूस केल्यावर येवले यांनी त्या महिलेचा कचरा वेचण्याचा व्यवसायाचा धागा पकडत जवळच असलेल्या भंगार विक्रेत्याला बोलावून विचारपूस केली असता, त्या भंगार विक्रेत्याने त्या महिलेला ओळखत असल्याचे सांगितले.

येवले यांनी तडक त्या विक्रेत्याला त्या महिलेच्या घरातून नातेवाईकांना बोलावून आणण्यास सांगितले. विक्रेता त्या मुलीला घेऊन आल्यावर, त्या महिलेला मुलीसोबत वाशी रुग्णालय पाठवून दीले. किरकोळ उपचार करून महिलेला सोडण्यात आले आहे, मात्र या कृतीने येवले यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दिवाळे गावातील शाळेच्या पुनर्विकासासाठी १० कोटींचा निधी

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे गावातील ७० वर्षांपूर्वीच्या शाळेचा कायापालट करण्यात येणार असून, या कामासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी तब्बल १० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे लवकरच ही शाळा स्मार्ट होणार आहे.



नवी मुंबई शहर हे झपाट्याने विकासाच्या मार्गाने जात आहे. तसेच आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नांतून व आमदार निधीमधून नवी मुंबई शहरामध्ये विकासकामे सुरू आहेत तसेच नवी मुंबई शहर हे सर्व सुविधायुक्त म्हणून नावारूपास आहे. त्यानुसार या गावाचा विकास होणार आहे.

दिवाळे गावातील ग्रामस्थांची शाळा ही गेली ७० वर्षेहून अधिक जुनी पूर्वीची असून ती मोडकळीस अवस्थेत आहे. या शाळेच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे सर्व पालकांनी आमदार मंदा म्हात्रे यांना भेटून समस्या सांगितल्या होत्या. त्याबाबत निवेदन दिले होते. याच अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सदर शाळेला भेट दिली होती. नवी मुंबई पालिका तत्कालीन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या सोबत चर्चा करून सर्व सुविधायुक्त शाळा बांधण्यात येईल यासाठी प्रयत्न केले होते.

या शाळेसाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मंजुरी देऊन जी प्लस २ इमारत बांधण्याकरिता १० कोटी इतका अपेक्षित खर्च येणार असून त्याची ७ सप्टेंबर रोजी निविदा जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार आमदार मंदा म्हात्रे यांनी दिवाळे गावातील ग्रामस्थांच्या शाळेचे पुनर्विकासाकरिता १० कोटी निधी उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थी वर्गाला सुंदर अशी एक सर्व सुविधायुक्त शाळा पहावयास मिळणार आहे.

# केबीपी कॉलेजमध्ये कर्मवीर जयंती सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये कर्मवीर जयंती सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहात १८ ते २२ सप्टेंबर पर्यंत विविध उपक्रम करण्यात आले आहे.



जयंतीदिनी २२ सप्टेंबर रोजी सोलापूर (मोहोळ) येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रार्थना फांऊडेशनचे प्रमुख प्रसाद मोहिते व अनु मोहिते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रसाद मोहिते यांना कर्मवीर पुरस्कार तर सामाजिक कार्यकर्त्या अनु मोहिते यांना लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुरस्कार प्रदान करण्यात येईल. २५ हजार रुपये, मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या सप्ताहात रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, कर्मवीर रथयात्रा, रक्तदान शिबीर, कर्मवीरायण चित्रपटाचे प्रदर्शन, भिंतीपत्रिका प्रदर्शन, कर्मवीरायण वाचनसोहळा व समाजोपयोगी उपक्रम असे विविध उपक्रम व स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

संस्थेच्या उपाध्यक्षा जयश्री चौगुले, तसेच मॉडर्न स्कूल व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. शुभदा नायक यांनी दिली.

# सोनखारचा राजा मंडळाकडून पर्यावरणावर भर

**नवी मुंबई : बातमीदार**

नाखावा सीताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळाचा सोनखारचा राजा गणेशोत्सवाचे २८वे वर्ष नव्या उत्साहात आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी वचनबद्धतेने साजरे करीत आहे.

१९८५मध्ये स्थापन झालेल्या मंडळाने आताच्या सानपाडा नोडमधील सोनखार - पामबीच परिसरात सामुदायिक भावना आणि विकास वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, ज्याने १९९९ पासून मोठ्या प्रमाणात वस्ती दिसू लागली.



परिसरातील एक प्रमुख सांस्कृतिक उत्सव म्हणून विकसित झालेला गणेशोत्सव यंदा पर्यावरणपूरकतेवर भर देणारा आहे. या अनुषंगाने, मंडळाने हा सण पर्यावरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत राहील या अनुषंगाने संपूर्णपणे कागदाच्या लगद्यातून (वृत्तपत्राच्या पानांपासुन) बनवलेल्या नऊ फूट गणेश मूर्तीची प्राणप्रतिस्थापना केली आहे. यंदाची मूर्ती उसाटणे येथील शिल्पकार मोरेश्वर पवार यांनी तयार केली आहे.

नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ सिताराम भगत यांनी स्थापन केलेले, निशांत करसन भगत यांच्या अध्यक्षते खालील व यंदाचे कार्याध्यक्ष विठ्ठल यादव यांच्या साजरे होणारे हे मंडळ सांस्कृतिक आणि सामाजिक सहभागाचे उदाहरण आहे. गणेशोत्सव, महाशिवरात्री, दहीहंडी आणि नवरात्री यासह विविध सणांच्या माध्यमातून सामुदायिक बंध अधिकाधिक दृढ करण्याचे काम सातत्याने करीत आहे.

मंडळाच्या यंदाच्या उत्सवात केवळ भक्तीच नव्हे तर सामाजिक जाणिवेवरही भर देण्यात आला आहे. यंदा देखाव्याच्या स्वरूपात मंडपातील विराजमान श्रीगणराया समोर वाढत्या वाहनांच्यामुळे निर्माण झालेली पार्किंग समस्या, वाहनांच्या हॉर्नने होणारे ध्वनी प्रदूषण आणि पर्यायी इंधन ना वापरल्याने हवामानात होणारे बदल यासारख्या समस्यांबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

सोनखार-पामबीच विभागातील सर्वच सेक्टर्स मधील निवासी नागरिकांना एकत्र आणणे आणि एकमेकांप्रती सहकार्य आणि बंधुत्वाची भावना वाढवणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहे. नाखवा सिताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळ हे समाजातील अध्यात्मिक आणि सामाजिक वाढीस चालना देणारी एक प्रमुख शक्ती आहे असे या मंडळाचे संस्थापक दशरथ भगत यांचे मनोदय आहे. मंडळाच्या शेकडो सर्वधर्मीय कार्यकर्त्यांसह समाजसेवक संदिप भगत, माजी नगरसेविका श्रीमती फशीबाई भगत, वैजयंती दशरथ भगत व रुपाली निशांत भगत यांचा विशेष सहभाग या गणेशोत्सवात लाभत असतो.

# ज्ञानेश महाराव यांना अटक करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारे माजी संपादक ज्ञानेश महाराव यांना अटक करण्याची मागणी बजरंग दलाच्या वतीने वाशी पोलीस ठाण्यात एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




या निवेदनात म्हटले आहे की, २२ ऑगस्ट या दिवशी वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात संभाजी ब्रिगेडने राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते. यामध्ये ज्ञानेश महाराव यांनी हिंदू धर्मियांचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्री राम, लक्ष्मण, सीतामाता आणि उर्मिला माता तसेच श्री स्वामी समर्थ यांच्या विषयी वादग्रस्त आणि अपमानकारक वक्तव्य केले आहे. यामुळे हिंदू धर्माच्या धार्मिक सिद्धांच्या दृष्ट हेतूने जाणीवपूर्वक अपमान करून समस्त हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या आहेत.

या प्रकरणी ज्ञानेश महाराव आणि इतर यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. ज्ञानेश महाराव हे समाजात जातीय द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करत असून यावरून दंगली घडवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यापुढे हिंदू धर्मा विरोधात कोणी टीका केल्यास त्याला चप्पल मारून धडा शिकवला जाईल, अशी चेतावणी विश्व हिंदू परिषद मातृ शक्ति कोंकण प्रांत संयोजिका मनिषा भोईर यांनी दिली. तसेच आरोपीस अटक न झाल्यास विश्व हिंदू परिषद पुन्हा पोलीस ठण्यासमोर आंदोलन करेल असे विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री सरूप पाटील पत्रकारांशी बोलताना सांगितले.

या वेळी बजरंग दल जिल्हा सहसंयोजक तेजस पाटील, जिल्हा सहसंयोजक शंकर संगपाळ, मातृ शक्ति जिल्हा संयोजिका माया परमार यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि श्री स्वामी समर्थ कोपरखैरणे केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आमदार महेंद्र थोरवे यांची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करावी

## कर्जतमध्ये शिवसैनिकांचे पोलिसांना निवेदन; आंदोलनाचा इशारा



**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी; अन्यथा आंदोलन करू, असे आशयाचे निवेदन कर्जत आणि नेरळ येथील शिवसैनिकांनी स्थानिक पोलीस ठाण्यात दिले आहे.

कर्जत तालुक्यात भररस्त्यात गाडी थांबवून एकजण दुसऱ्या चालकाला बेदम मारहाण करीत असलेला व्हिडीओ व्हायरल झाला आहे. मारहाण करणारा व्यक्ती हा कर्जत विधानसभेचे आमदार महेंद्र थोरवे यांचा बॉडीगार्ड असल्याचा गंभीर आरोप यामध्ये करण्यात आला आहे. आमदार थोरवे यांनी मात्र त्यांच्यावरील आरोपांचे खंडन केले आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी शिवसैनिक मोठ्या संख्येने कर्जत पोलीस ठाण्यात जमले होते.

शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, अरुण देशमुख, अभिषेक सुर्वे या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक कर्जत पोलीस ठाण्यात आले आणि त्यांनी पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांना निवेदन देऊन आमदार थोरवे यांची बदनामी करणाऱ्यांवर आठ दिवसात करवाई करावी; अन्यथा शिवसैनिक आंदोलन करतील, असा इशारा दिला. अशा प्रकारचे निवेदन नेरळ पोलीस ठाण्यातही शिवसैनिकांनी दिले आहे.

## खालापुरातही बदनामी थांबवण्याची मागणी

### शिवसेनेने वेधले पोलिसांचे लक्ष

**चौक : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या बदनामीचे षडयंत्र सध्या सुरू असून ते त्वरित कारवाई करून थांबवा, असे निवेदन खालापूर शिवसेनेच्या वतीने पोलिसांना देण्यात आले.

कर्जत तालुक्यात भररस्त्यात गाडी थांबवून एकजण दुसऱ्या चालकाला बेदम मारहाण करीत असलेला व्हिडीओ व्हायरल झाला आहे. मारहाण करणारी व्यक्ती आमदार महेंद्र थोरवे यांचा अंगरक्षक असल्याचे प्रसार माध्यमातून सांगितले जात आहे. काही दिवसांपूर्वी खालापूर तालुक्यात मारहाणीचा प्रकार घडला होता. या प्रकरणात आमदार महेंद्र थोरवे यांनी पोलिसांवर दबाव आणून जीवे मारण्याचा गुन्हा दाखल करावा, असा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. आमदार महेंद्र थोरवे यांचा कोणताही दोन्ही गुन्ह्यांशी संबंध नसताना विरोधी पक्ष आरोप करून बदनामी करीत आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांनी खुलासा करूनही विरोधी पक्ष आरोप करीत असल्याचे पोलिसांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी खालापूर तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.



# नागोठण्यात शांतता कमिटीची बैठक

## सण, उत्सव सलोख्याने साजरे करा –पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर



**नागोठणे : प्रतिनिधी**

येत्या सोमवारी म्हणजेच १६ सप्टेंबर रोजी ईद–ए–मिलाद आणि मंगळवारी सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी तसेच आगामी विधानसभा निवडणूक या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात शनिवारी (दि.१४) शांतता कमिटीची बैठक झाली. या वेळी रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर यांनी सण–उत्सव सलोख्याने साजरे करून शांतता व सहकार्याचे आवाहन केले.

या बैठकीस नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक सचिन कुलकर्णी, हवालदार विनोद पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नाजीमशेठ नालखंडे, उपसरपंच आखलाख पानसरे, कामगार नेते संजय काकडे, शांतता कमिटीच्या सदस्य निलोफर पानसरे, कल्पना टके, मंजुळा म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य डॉ.मिलिंद धात्रक, ज्ञानेश्वर साळुंखे, ॲड. प्रकाश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सिराज पानसरे, अशपाक पानसरे, असिफ मुल्ला, कीर्तिकुमार कळस, लायन्स क्लबचे अध्यक्ष सुनील कुथे, मिजफ्फर कडवेकर, बाजारपेठ गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष जैन, राजू गुरव, नितीन राऊत, कमलाकर राणे आदींसह नागरिक उपस्थित होते.

या वेळी पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर म्हणाले की, एक छोटीसी चूकसुद्धा फार महागात पडू शकते हे मी माझ्या ३२ वर्षाच्या पोलीस खात्यातील अनुभवाने सांगत आहे. कोणत्याही गोष्टीची सत्यता पडताळून घेतल्याशिवाय आपण पाऊल उचलू नका. अफवांवर विश्वास ठेवू नका. आपण सर्व माझ्या कुटुंबातील सदस्य आहात. त्यामुळे आपणांस कुठलीही शंका असेल, तर मला सांगा, असेदेखील दौंडकर यांनी सांगितले.

# चित्रकार प्रमोद दिक्षित यांचे उद्या पोलादपूरच्या गणेशोत्सवात चित्र प्रदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कमर्शियल आर्टसमध्ये जागतिक ख्याती प्राप्त चित्रकार आणि पोलादपूरचे सुपुत्र प्रमोद दिक्षित यांच्या वैविध्यपूर्ण चित्रांचे प्रदर्शन पाहण्याची संधी मिळणार आहे. हे प्रदर्शन पोलादपूर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहात येत्या सोमवारी (दि. १६) सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

जागतिक स्तरावरील जाहिरात कंपन्यांच्या मागणीनुसार चित्राद्वारे संकल्पना सादर करणाऱ्या प्रमोद दिक्षित यांना गेल्या काही वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण जनजीवनाने घातलेली भुरळ त्यांच्या अनेक चित्रकृतींद्वारे स्पष्ट होत असून पंतप्रधान मोदी यांचा हात धरून राममंदिरामध्ये जाणारे पाठमोरे रामलल्ला चेहऱ्याने कसे दिसत असावेत हा कल्पनाविष्कार दिक्षित यांच्या कुंचल्यातून अप्रतिमपणे साकारला गेला आहे. चित्रकलाप्रेमींसह सर्वांनीच चित्रकार दिक्षित यांचा कलाविष्कार पाहण्यासाठी आवर्जून चित्रप्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अमरदीप नगरकर यांनी केले आहे.

# पेण, रामवाडी, वडखळ एसटी स्थानकांचा कायापालट

## आमदार रविशेठ पाटील यांच्या पुढाकाराने शहरातील विविध कामे पूर्णत्वाकडे

**पेण : प्रतिनिधी**

एकीकडे पेण, रामवाडी, वडखळ एसटी बसस्थानकांचा कायापालट झाल्याने प्रवासीवर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. यासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून पेण, रामवाडी, वडखळ स्थानकाचे काम रामेश्वर कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून झाले असून लवकरच रोहा स्थानकाच्या कामालाही सुरुवात होणार आहे.



रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण, रामवाडी व वडखळ बसस्थानकाची दुरवस्था झाली होती. मागील सुमारे २० ते २५ वर्षांपासून येथील प्रवाशांना खड्डेमय स्थानकातून प्रवास करायला लागायचा. अनेकदा स्थानकातील खड्ड्यांमधील छोट्या मोठे दगड एसटी बसच्या टायरखाली येऊन उडत असल्याने काही प्रवाशांना दुखापतही झाली तसेच अरुंद स्थानकामुळे अपघातही झाले होते. पावसाळ्यात तर बसस्थानकात गुडघाभर पाणी साचायचे. संपूर्ण स्थानक चिखल व पाण्याने भरायचे. त्यामुळे जेष्ठ नागरिक, गर्भवती महिला, विद्यार्थीवर्गासह प्रवाशांना विविध समस्यांना समोरे जावे लागत होते.

याबाबत प्रवासी संघटना व जनतेने तक्रारी करूनदेखील एसटी प्रशासन लक्ष देत नव्हते. अखेर एमएमआरडीएच्या माध्यमातून शासनाच्या वतीने हे काम पूर्ण होत आहे. आमदार रविशेठ पाटील यांनी स्थानकांच्या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. शहरातील अनेक कामे मार्गी लावण्यासाठी आमदार पाटील यांच्या माध्यमातून पाठपुरावा होत असून यामध्ये विश्वेश्वर स्मशानभूमी, भोगावती नदी विसर्जन घाट, रिंगरोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन अशी मुख्य कामे असून यातील काही कामे मार्गी लागली असून काही कामे पूर्णत्वाकडे आहेत. शहरातील पाणीपुरवठ्यासाठी नव्याने जलशुद्धीकरण प्रकल्प बांधण्यास निधी मिळावा याकरिता शासनाकडे आमदारमहोदय प्रयत्नशील आहेत.

पेण, रामवाडी, वडखळ एसटी स्थानकात प्लॅटफॉर्म बनवण्यात आले असून उंच भराव करून काँक्रीटीकरण करण्यात आल्याने भविष्यातही या स्थानकांमध्ये पावसाळ्यात पाणी साचून प्रवाशांना त्रास होणार नाही. पेण, वडखळ येथील स्थानकांचे काम जलदगतीने झाले असून रामवाडी स्थानक पूर्णत्वाकडे आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर एसटी स्थानकात पे ॲण्ड पार्कची व्यवस्था करण्यात येणार आहे, ज्यायोगे प्रवाशांना त्यांची दुचाकी वाहने एसटी स्टॅण्ड परिसरात पे ॲण्ड पार्कमध्ये लावता येतील. त्यातून एसटी महामंडळाला उत्पन्न व सुरू होईल, अशी माहिती पेण स्थानकाच्या डेपो मॅनेजर अपर्णा वर्तक यांनी दिली.

# वडखळमध्ये जुन्या रागातून कुटुंबाला मारहाण

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील वडखळ पोलीस ठाणे हद्दीत कोलेटीवाडी येथे आरोपींनी घरातील मुलीने प्रेमविवाह केला तसेच फिर्यादींनी घराचे बांधकाम केले. याचा राग मनात धरून कुटुंबाला जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे शेजारी आहेत. सोमवारी दुपारी १.३०वा.च्या सुमारास फिर्यादींच्या घराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी आले असता आरोपी त्याचे इतर नातेवाईकांसोबत तेथे थांबला होता. त्यातील एकाने आरोपीला अर्वाच्च भाषेत बोलून फिर्यादींना लोखंडी रॉडने मारहाण केली. त्याचप्रमाणे आरोपीसोबत १७ जणांनी फिर्यादी व त्यांची पत्नी, मुलगा यांच्या अंगावर विटा व सिमेंटचे ठोकळे फेकून दुखापती केल्या. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# कर्जतमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून नवरत्नांचा सन्मान



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने तालुक्यातील विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या २० नवरत्नांचा तसेच पाच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा सन्मान करण्यात आला. हे मंडळ गेली ८८ वर्षे विविध उपक्रम राबवित असून यंदा प्रथमच मंडळाने सन्मान उपक्रम केला आहे.

श्री कपालेश्वर मंदिर सभागृहात कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे व्यासपीठावर उपस्थित होते. मंडळाचे खजिनदार पंकज शहा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विवेक भागवत यांनी मंडळाच्या कार्याचा आढावा सादर केला.

या वेळी खुशी हजारे (बाल कलाकार), अमृता भगत (पॉवरलिफ्टींग खेळाडू), निलेश परदेशी (आरोग्यसेवक), विजय मांडे (पत्रकारिता), सिद्धांत जोशी (क्रीडा), राजेश कोठारी (सार्वजनिक रक्तदाता), सागर सुर्वे (इतिहास अभ्यासक), क्रिशा जैन (महिला वैमानिक), संतोष दगडे (एव्हरेस्ट वीर), डॉ. अनिरुद्ध जोशी (आरोग्य), जुई गडकरी (अभिनेत्री), पराग बोरसे (चित्रकार), नितीन आरेकर (शिक्षण, निवेदक, लेखक), प्रसाद पाटील (भजन), महेश वैद्य (उद्योजक), श्रीराम पुरोहित (कीर्तनकार), जान्हवी मुळे (पत्रकारिता), गुरूनाथ साठेलकर (बचावकार्य), राहुल वैद्य (अभिनेता), विवेक भागवत (संगीत) या नवरत्नांचा तसेच दहिवली विचार मंच, नूतन गणेश मंडळ, ओंकार मित्र मंडळ पाटील आळी गणेशोत्सव मंडळ, वंदे मातरम मित्र मंडळ या संस्थांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व गणेश प्रतिमा देऊन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

डॉ. आरेकर यांनी मनोगत व्यक्त करताना, मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत, परंतु आपल्या माणसांनी केलेला आजचा सन्मान माझ्या हृदयात कायमच राहील. कर्जत तालुक्यात राम गणेश गडकरी, आरती प्रभू, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक नामवंतांनी वास्तव्य केले आहे, असे सांगून कर्जत शहरात पुस्तकांचे गाव वसवण्याचे सूचित केले. जुई गडकरी हिने, श्री कपालेश्वराच्या कृपेनेच मी यश मिळवले आहे. ते कायमच स्मरणात आहे. असेच कृपाछत्र श्री कपालेश्वराबरोबरच कर्जतकरांचे कायम असावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आमदार थोरवे म्हणाले की, कर्जतकरांनी मला राज्यात प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. त्यामुळे मी घर विसरून काम करीत आहे. घराकडे पाठ आहे. आपल्याला अनेक कामे करायची आहेत. कर्जतचे नंदनवन करायचे आहे. आपल्या तालुक्यात पर्यटन बहरत आहे. ते अधिक चांगल्या प्रकारे करायचे आहे. तालुक्यासाठी अजून मोठे काम करायचे आहे. त्यासाठी प्रादेशिक कृषी केंद्राची जमीन मिळावी असे प्रयत्न सुरू आहेत. कर्जतमध्ये अनेक नवरत्ने आहेत. त्यांचा सन्मान करण्याचा मान मला मिळाला हे माझे परमभाग्य आहे. टेकडीवरील तहसील कार्यालयात पुस्तकांचे गाव आपण करू, असा शब्दही त्यांनी दिला. विवेक भागवत यांनी खास शैलीत सूत्रसंचालन करून समारंभाला रंगत आणली.

समारंभास माजी नगरसेवक निलेश हरिश्चंद्रे, मिलिंद चिखलकर, दिलीप गडकरी, विकास चित्ते, मंगला पुरोहित, मल्हारी माने, सुनील कदम, सदानंद मुळे, दिनेश कडू, वैदेही पुरोहित, दिनेश जैन, दीपा बोरसे, अभिजित मराठे, सदानंद जोशी, अश्विनी बोरसे, प्रशांत पाटील, अमित मराठे, मंदार लेले, रौनक कोठारी, दीपक बडगुजर, मिलिंद खंडागळे, कौस्तुभ पराजपे, कल्पेश शाह, रघुनाथ खैरे, सर्वेश गोगटे आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वे रात्रीच्या विशेष २२ उपनगरीय गाड्या चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

सध्या गणेशोत्सव सुरू असून मध्य रेल्वे भाविकांसाठी २२ विशेष रात्रीच्या उपनगरीय गाड्या चालवणार आहे. याचा लाभ गणेशभक्तांना होणार आहे.

हार्बर लाइनवर विशेष उपनगरीय गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल आणि परत गणपती विसर्जनाच्या दिवशी १७ व १८ सप्टेंबरला रात्री चालतील. या विशेष गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई आणि कल्याण/ठाणे/पनवेलदरम्यान सर्व स्थानकांवर थांबतील. डाउन मेन लाइनवर १४, १५, १६, १७ व १८ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–कल्याण विशेष १ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून १.४० वाजता सुटेल आणि कल्याण येथे ३.१० वाजता पोहचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–ठाणे विशेष १ ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून २.३० वाजता सुटेल आणि ठाणे येथे ३.३० वाजता पोहचेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–कल्याण विशेष १ गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ३.२५ वाजता सुटेल आणि कल्याण येथे ४.५५ वाजता पोहचेल.

मेन लाइनवर १४, १५ १६, १७ व १८ रोजी कल्याण–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ गाडी कल्याण येथून ५ वाजता सुटेल आणि १.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहचेल.

ठाणे–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ गाडी ठाणे येथून १ वाजता सुटेल आणि २ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहचेल. ठाणे–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ४ गाडी ठाणे येथून २ वाजता सुटेल आणि ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहचेल.

डाऊन हार्बर लाईनवर (फक्त १७ व १८ रोजी) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–पनवेल विशेष १ गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून १.३० वाजता सुटेल आणि पनवेल येथे २.५० वाजता पोहचेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–पनवेल विशेष ३ गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून २.४५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे ४.०५ वाजता पोहचेल.

अप हार्बर लाईनवर (फक्त १७ व १८ रोजी) पनवेल–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ गाडी पनवेल येथून १ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे २.२० वाजता पोहचेल. पनवेल–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ४ गाडी पनवेल येथून १.४५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे ३.०५ वाजता पोहचेल. प्रवाशांनी या रेल्वेसेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत शालेय बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषदेच्या सहकार्याने नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते. ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन येथे झालेल्या या स्पर्धेत गतवर्षीच्या तुलनेत यंदा स्पर्धेतील सहभागी संघांची दुपटीने वाढ झालेली आहे.

१४, १७ आणि १९ वर्षाआतील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतून पहिल्या दिवशी मुलांच्या गटात ६७ संघ आणि दुसऱ्या दिवशी मुलींच्या गटात ४२ संघ असे एकूण १०९ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचा शुभारंभ ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव डॉ. हेमंत अनार्थे यांच्या हस्ते झाला. या वेळी महापालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन समिती सदस्य धनंजय वनमाळी, ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे व्यवस्थापन समिती सदस्य प्रवीण पैठणकर, संतोष राणे, बॅडमिंटन संघटनेचे पदाधिकारी व प्रमुख पंच शिवा करियाली आदी मान्यवर उपस्थित होते. प्रत्येक गटातील विजेत्या संघांना पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.



**रोहा : जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेतील 'रोहा श्री'चा मानकरी ठरलेला उदय देवरे याचे अभिनंदन करताना भाजप तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे व विहान जिम नागोठणेचे मालक भरत गिजे.** (छाया : शामकांत नेरपगार)









**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांनी ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्या आसूडगाव येथील निवासस्थानी, नावडे येथील हरेश्वर पाटील, खुटूक बांधण येथील विनोद घरत यांच्याकडे तसेच श्री महालक्ष्मी व्यापारी वेल्फेअर असोसिएशन श्री सिद्धिविनायक उत्सव मित्र मंडळाच्या गणरायाचे दर्शन घेतले. सोबत शुभ पाटील, फुलाजी ठाकूर, गुरू ठाकूर, संस्कृती पाटील, सार्थक पाटील आदी.**



**कळंबोली : भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविशेठ पाटील यांच्या घरच्या गणपतीचे सरचिटणीस दिलीप बिष्ट, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष केशव यादव, युवा मोर्चा सरचिटणीस निशाण गिल यांनी दर्शन घेतले. या वेळी माजी नगसेविका प्रमिला पाटील व अन्य उपस्थित होते.**



**रोहा : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांनी युवा मोर्चा रोहा तालुका सरचिटणीस मिलिंद झुरे यांच्या न्हावे येथील गणरायाचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत दिनेश झुरे, अक्षय भायतांडेल, रवी भायतांडेल, वृषाल हाळकर, प्रद्रेश पाटील उपस्थित होते.**




**पंकज गुरूनाथ तांबडे, नेरेपाडा, पनवेल**




**सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कर्जत**



**पनवेल : जी.एच. बागवान क्लासेसमध्ये सर्वधर्मसमभावाचा संदेश देत शिवसेनेचे युवा नेते गुलाब बागवान व त्यांच्यासोबत असणाऱ्या मुस्लिम विद्यार्थ्यांनी मिळून शिवाजीनगर झोपडपट्टी या ठिकाणी गणपती बाप्पाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली आहे. या ठिकाणी माजी नगरसेवक अजय बहिरा यांनी जाऊन दर्शन घेतले. त्यांचे इम्रान बागवान, परवेज बागवान, ईशान बागवान, धीरज जिरे त्याचबरोबर क्लासच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले.**



**पनवेल : भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे विभाग अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, चिपळे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच मुकेश फडके यांनी अंबिवली येथील भाजपचे सुरेश घनसोलकर यांच्या घरी गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.**



**पाटील आळी गणेशोत्सव मंडळ, कर्जत**



**लायन ग्रुप अध्यक्ष जितेंद्र फडके, विहिघर, पनवेल**

खुष खबर ! ॥ श्री गणेशाय नमः ॥ खुष खबर !
हातमाग व यंत्रमाग
कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री
गौरी गणपती सणा निमित्त
- स्थळ -
डोंगरे हॉल सार्वजनिक वाचनालय पोस्ट ऑफिस समोर अलिबाग
दि. २३/८/२०२४ ते १७/९/२०२४ पर्यंत
वेळ -सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत
20% सूट स्पेशल ऑफर
सोलापूरातील सुप्रसिद्ध
ईरकली कॉटन साडी
ईरकली सिल्क साडी
मधुराई कॉटन साडी
खादी कॉटन साडी
धारवाड साडी
मदुराई सिल्क साडी
सेमी पैठणी साडी
खादी सिल्क
प्रिंटेड वर्क ड्रेस
कॉटन परकर
टॉप पीस,
सोलापूर चादर
बेडशीट, नॅपकिन
संतरंजी, पंचा
वुलन चादर
टॉवेल, दिवाणसेट,
प्रिंटेड बेडशीट
शबनम बॅग
पिलो कव्हर
लुंगी, शुटींग
व शर्टींग शर्ट
कुर्ता, बंडी,
गाऊन, हॅन्डबॅग
लेडीज टॉप
आयोजक
भाऊराया हॅन्डलुम सोलापूर.
प्रदर्शनाला एक वेळ अवश्य भेट द्या !
फोन नं 9325329105/9860890774

जीवेत् शरदः शतम्
हेमंत माने
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छुक :
उमेश पोतदार,
राजेंद्र पाटील



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com